दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक २६५ ● शनिवार, ०५ जुलै २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## जोपर्यंत कर्जमाफी नाही तोपर्यंत वसुली नाही: बच्चू कडू

**मुंबई :** प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी आपल्या ठाम शैलीत पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. शेतकऱ्यांच्या थकीत वीजबिल माफीसाठी आज मुंबईत आंदोलनाची हाक दिली आहे. ७/१२ कोरा करा, जोपर्यंत कर्जमाफी नाही तोपर्यंत वसुली नाही, अन्यथा उलटं टांगू, असा इशारा दिला आहे. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी जूनमध्ये आंदोलन केले होते. मोझरीमधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी त्यांनी उपोषण केले होते. महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देतो, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ती द्यावी अशी त्यांची मागणी होती. त्यासाठी बच्चू कडू यांनी उपोषण केल्यानंतर त्यांना याबाबत समिती स्थापन करून निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले. मात्र समिती स्थापनेस होत असलेली दिरंगाई लक्षात घेता त्यांनी ७ जुलैपासून पुन्हा पदयात्रा काढण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, कर्जमाफीच्या मुद्द्यावर तीन जुलैला मंत्रालयात बैठक लावण्यात आली आहे. महसूलमंत्री बावनकुळे बैठकीला उपस्थित राहतील.

### झापुक । zupuk

जे लोक मोठं
खोटं बोलतात
ते नेते होतात
ज्या चेहऱ्यावर खोटा
मेकअप करतात ते
जास्त सुंदर दिसतात
जे जास्त खोटा व्यापार
करतात तेच मोठया
तिजोऱ्या भरतात
कलियुगात खोटेच
जगतात खरे तळतळ
करून मरतात

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

### महत्वाचे...

#### दरोडाप्रकरणी गुन्हा; फरार आरोपीचा भाजपमध्ये प्रवेश!

**नाशिक :** येथे शिवसेना ठाकरे गटातील सर्वच बड्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. काही माजी नगरसेवक, ज्येष्ठ पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. प्रशांत दिवे, सीमा ताजणे, सचिन मराठे या तीन माजी नगरसेवकांचा भाजप प्रवेश होणार आहे. याशिवाय काही दिवसांपूर्वीच शिवसेना ठाकरे गट महानगरप्रमुखपदी नियुक्ती झालेले मामा राजवाडेही भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. तीनच दिवसांपूर्वी मामा राजवाडे यांच्यावर भद्रकाली पोलीस ठाण्यात दरोडा आणि मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे.

#### कुरिअरवाला नव्हे तो बॉयफ्रेंडच, कोंढवा प्रकरणात मोठा ट्विस्ट

**पुणे :** शिक्षणाची पंढरी असलेल्या पुण्यात गेल्या काही महिन्यात पुण्यातील वाढत्या गुन्हेगारी पाहता पुणे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये अधिक असल्याचं पाहायला मिळत आहे. त्यातच, पुण्यातील कोंढवा परिसरातील २५ वर्षीय तरुणीने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार, एका २८ ते ३० वर्षीय डिलिव्हरी बॉयने घरात घुसून तिच्यावर अतिप्रसंग केल्याचं म्हटलं होतं. मात्र, या प्रकरणात आता धक्कादायक ट्विस्ट समोर आला असून अतिप्रसंग करणारा युवक हा तरुणीचा बॉयफ्रेंडच असल्याचं पोलीस तपासात उघड झाले आहे. विशेष म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून ते एकमेकांशी शारिरीक संबंधात होते.

## ठाकरे बंधूंचे आज शक्तीप्रदर्शन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीचा, त्रिभाषासूत्रीचा शासन निर्णय मागे घेतला असून यासंदर्भात समिती नेमण्यात येणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे, मराठीच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येणार होता, आता तो रद्द करण्यात आला असून शिवसेना-मनसेकडून विजयी जल्लोष मिळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वरळीत ५ जुलै रोजी हा मेळावा होत असून या मेळाव्याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. या मेळाव्यात ठाकरे बंधू नेमकं काय बोलतील, याची सर्वांना उत्सुकता आहे. या विजयी मेळाव्यासाठी नाशिकमधून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पक्षाचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते संयुक्तरित्या मुंबईकडे रवाना होणार आहेत. सकाळी ६.३० च्या सुमारास हे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मुंबईसाठी प्रस्थान करतील.या मेळाव्याच्या निमित्ताने शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेचे प्रमुख राज ठाकरे हे एकाच मंचावर दिसणार आहे. तर नाशिकमधून मनसे आणि ठाकरे गटाचे कार्यकर्ते संयुक्त रॅलीच्या माध्यमातून दोन्ही पक्ष आपली ताकद दाखवत जोरदार शक्तिप्रदर्शन करत मुंबईकडे रवाना होणार आहेत. विशेष म्हणजे हिंदी सक्तीच्या विरोधातील लढ्यात एकवटलेल्या या दोन्ही पक्षांची ही एकजूट भविष्यातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या विजयी मेळाव्याकडे आता राज्यभराचे लक्ष लागले आहे.

### • डोम परिसरातील बॅनर्सची जोरदार चर्चा

वरळी डोम परिसरातील या बॅनरवर राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासोबत बाळासाहेब ठाकरे यांचे एकत्र फोटो पाहायला मिळत आहेत. आम्ही गिरगावकर या संघटनेकडून 'जी मराठी लोक चुकीची रिक्षा पकडून नागपूरला गेले आहेत, त्यांनी परत मुंबईत ठाकरे बंधूंकडे या, नाहीतर कायमचे गुजरातला पोहोचाल' आणि सभा झाल्यावर आदेश द्या, मराठी महाराष्ट्र द्रोही लोकांना सरळ करायचे आहे. आम्ही आदेशाची वाट पाहत आहोत' अशा आशयाचे बॅनर लावण्यात आलेले आहे. तसेच ब्रँड मराठीचा फक्त ठाकरेच महाराष्ट्र माझा अशा प्रकारचे बॅनर ही या परिसरात लावण्यात आले आहे. या बॅनर्सची आता जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### • शिवशक्ती भीमशक्ती तुटली!

या मेळाव्याला प्रकाश आंबेडकर किंवा वंचित बहुजन आघाडीचा कोणताही प्रतिनिधी उपस्थित राहणार नाही, अशी स्पष्टोक्ती प्रकाश आंबेडकरांनी माध्यमांशी बोलताना दिली. आमचा उद्याच्या मेळाव्याशी काहीही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांची उद्धव ठाकरेंसोबतची 'शिवशक्ती- भीमशक्ती' युती तुटल्यानंतर अजूनही उद्धव ठाकरेंवर नाराज असल्याचे संकेत मिळत आहे.

## सामाजिक न्यायचा निधी लाडक्या बहिणींसाठी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना जून महिन्याचे अनुदान देण्यासाठी अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाख रुपये इतका निधी वळविण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली होती. आता जून महिना हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय कडून ४१० कोटी वर्ग करण्याबाबतचा जीआर काढण्यात आला आहे.

लाडक्या बहिणींसाठी सामाजिक न्याय विभागावर अन्याय केला जात असल्याची भावना निधी वळवल्याने केला जात आहे. सामजिक न्याय विभागासोबत आदिवासी विभागाचा निधी देखील वळवण्यात आला आहे. दोन्ही विभागाचे मिळून तब्बल एक हजार कोटीचा निधी वळवला आहे. आपल्या मंत्र्याच्या खात्याचा निधी वळवल्याने शिंदे अजित पवारांवर नाराज होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

निधी वळवल्याने लाडकी बहीण योजनेचा हफ्ता महिलांच्या खात्यात लवकरच जमा होण्यास सुरुवात होणार आहे. ज्या महिलांचे खाते आधारला लिंक आहे त्या महिलांच्या **(पान ४ वर)**

### निधीवरून वाद घातल्याने शिरसाट यांची प्रकरणे बाहेर : आ. आव्हाड

संजय शिरसाट यांनी निधीवरुन वाद घालण्याचा प्रकार केला आणि त्यांची इतकी प्रकरणं बाहेर आली की त्यांनी बोलणंच बंद केले असा गंभीर आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. सामाजिक न्याय, आदिवासी आणि ओबीसींचा निधीच पहिला जातो, यांच्याबद्दल यांना प्रेमच नाही आहे. शिरसाट सारख्या लढवय्या शिवसैनिकांची शेळी करुन टाकली अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

## एकनाथ शिंदेंच्या गुजरात प्रेमाची राज्यात चर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** येथील एका कार्यक्रमात गृहमंत्री अमित शाह यांच्यासमोर भाषण करताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी जय गुजरातचा नारा दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आपल्या भाषणाच्या शेवटी अमित शाहा यांच्यावर स्तुतीसुमने उधळत शेरो शायरी केली. त्यानंतर, जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात.. असे म्हणत एकनाथ शिंदेंनी आपलं भाषण संपवलं. मात्र, एकनाथ शिंदेंच्या या वक्तव्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जय गुजरात म्हटल्यावरुन आता महाविकास आघाडीचे नेते, प्रवक्ते शिंदेंवर सडकून टीका करत आहेत. तर, महायुतीच्या नेत्यांकडून त्यांची पाठराखण




केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात हिंदी सक्तीवरुन वाद सुरु होता. मात्र, ठाकरे बंधूंनी मोर्चाचं आयोजन केल्यानंतर तो निर्णय सरकारने मागे घेतला.

गुजराती बंधू समाजाच्या वतीने उभारण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटरचा उद्घाटन सोहळा केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्याहस्ते संपन्न झाला. या सोहळ्याला उपस्थित राहून एकनाथ शिंदेंनी आपले मनोगत मांडले. त्यावेळी, भाषणाच्या शेवटी जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात असे त्यांनी म्हटले. त्यावरुन, वाद निर्माण झाला असून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

> माझी प्रतिक्रिया खूप खऊट असते. पण मी ते ऐकलं नाही, त्यामुळे त्याच्यावर आत्ताच बोलणार नाही,'' तुम्हाला हिंदी सक्ती करायची तर देशात मराठी सक्ती करा ते होणार का ? असा सवालही त्यांनी राज्यकर्त्यांना विचारला आहे.
>
> **जरांगे पाटील,**
> **मराठा आंदोलक**




### शरद पवारांनी ही म्हटले होते जय कर्नाटक...

यापूर्वी एकदा छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे उद्घाटन करताना शरद पवार साहेब 'जय महाराष्ट्र, जय कर्नाटक' म्हणाले होते. याचा अर्थ त्यांचं कर्नाटकावर जास्त प्रेम आहे आणि महाराष्ट्रावर कमी प्रेम आहे, असं समजायचं का? इतका संकुचित विचार मराठी माणसाला शोभत नाही.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री

## कुणाल कामरा, सुषमा अंधारे यांच्यावर विधिमंडळात हक्कभंग मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** मागील विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान कॉमेडियन कुणाल कामरा आणि शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याच्या कारवाईला जोर आला होता. आता, पावसाळी अधिवेशनात या दोघांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव मंजूर झाला आहे.

कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या नया भारत या कॉमेडी शोमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक टिका केली होती. कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्या दाढी, चष्म्यावरुन आणि शिवसेना पक्षातील बंडावरुन केलेले विडंबनात्मक गाणे गायले. कुणाल कामराचा हा व्हिडिओ तुफान व्हायरल झाल्यानंतर शिवसैनिक चांगलेच संतप्त झाले. तर, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाकडून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. सुषमा अंधारेंनीही व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे, या दोघांविरुद्ध हक्कभंग दाखल करण्यात आला होता, त्यास मंजुरी देण्यात आली आहे.

कुणाल कामराने जिथं हे गाणं गायलं, त्या स्टुडिओची काही शिवसैनिकांनी तोडफोड केली. तसेच, कामराविरुद्ध मुंबईतील काही पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. तर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी देखील कुणाल कामराचं गाणं म्हटल्याचा व्हिडिओ समोर आला. त्याचे पडसाद विधिमंडळाच्या सभागृहात देखील उमटले. त्यानंतर कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे **(पान ४ वर)**

## भाषेवरून गुंडगिरी खपवून घेणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** मुंबईत भाषेवरून व्यक्तींना होत असलेली मारहाण सहन केली जाणार नाही, आम्हालाही मराठी भाषा प्रिय आहे. पण, भाषेवरुन गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीसांनी ठणकावून सांगत मीरा भाईंदरमध्ये व्यापाऱ्याला मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच, मराठी भाषेचा अभिमान चुकीचे नाही, पण भाषेच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही. भाषेवरुन वाद घालणाऱ्या, मारहाण करणाऱ्या अशा गुंडशाहीवर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रात मराठीचा मुद्दा तापला असताना मनसे कार्यकर्त्यांनी २९ जूनच्या रात्री मराठी भाषा न बोलल्याच्या कारणावरून जोधपूर स्वीट्स अँड फरसाणचे मालक बाबूलाल चौधरी यांना मराठी भाषेचा अपमान केल्याच्या आरोपावरून मारहाण केली होती. बाबूलाल यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मीरा-भाईंदरमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मीरा भायंदर येथील व्यापाऱ्यास मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. एखादा मराठी व्यापारी आसाममध्ये जाऊन भाषा शिकायला वेळ लागत असेल तर त्याला मारहाण करणार का, असा सवालही फडणवीसांनी उपस्थित केला. खरा अभिमान असेल तर मराठी भाषा शिकवा, क्लासेस घ्या, इंग्रजीला का मग गळे लावता. स्वतःच्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकायचं आणि मराठीसाठी गळा काढायचा, असे म्हणत ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्षपणे टीका केली.

गुजराती कार्यक्रमात गेल्याने जय गुजरात बोलल्याने संकुचित विचारातून टिका करणे शोभत नाही. सध्या विरोधकांकडे मुद्देच राहिले नाहीत, ज्यामुळे ते असे मुद्दे उचलतात. मला मराठीत बोलायच तर मी मराठीत बोलीन, पण दुराग्र कोणी करू शकत नाही. मागे पवारसाहेब कर्नाटकला असताना तेही जय कर्नाटक बोलले होते, याची आठवणही देवेंद्र फडणवीसांनी करुन दिली.

## कृत्रिम वाळू धोरण राबवणार

### प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स, २४ तास वाळू वाहतूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** राज्यात नैसर्गिक वाळूची मर्यादा लक्षात घेता शासनाने कृत्रिम वाळू धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार असून त्यासाठी ५ एकर जमीन दिली जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

तसेच या उद्दिष्ट पूर्ततेसाठी तीन महिन्यांत १००० क्रशर युनिट्स सुरू करण्यात येणार असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

तर राज्यात वाळू वाहतूक संदर्भात दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला. त्यानुसार सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे. अशी घोषणाही महसूल मंत्र्यांनी केली.

याबाबत येत्या आठ दिवसांत राज्याचे नवे वाळू धोरण जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या वाळू तस्करीबाबत विधान परिषेदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केले होता. तर त्याचवेळी विधानसभेतही यासंदर्भात सोमवारी (३० जून) लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती. यासंदर्भात गुरुवारी विधानसभेत चर्चा झाली. राज्य सरकारकडून लवकरच नवे वाळू धोरण लागू करण्यात येत आहे.

त्यामुळे, नागरिकांना बांधकामासाठी वाळू सहज उपलब्ध होईल, असे सांगतानाच नवीन वाळू धोरण तयार करताना देशभरातील अनेक राज्यांचा यासंदर्भातील धोरणांचा अभ्यास करून त्याला अंतिम स्वरुप देण्यात आल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. बावनकुळे म्हणाले, सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



महसूल मंत्र्यांची घोषणा

एनजीटीच्या अटीमुळे १० जूननंतर काही घाटांवर मर्यादा आल्या असल्या तरी ज्या ठिकाणी पर्यावरण परवानगी आवश्यक नाही अशा घाटांवरून घरकुलांना वाळूचा पुरवठा थांबवण्यात येणार नाही. नवीन वाळू धोरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील पहिल्या निविदेतूनच राज्याला १०० कोटी रॉयल्टी मिळाली आहे. हे धोरण अर्थसंकल्पीय दृष्टिकोनातूनही राज्यासाठी लाभदायक ठरणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

मागच्या काळात वाळूसाठी डेपोचे धोरण आले होते, शासनाने ते रद्द केले आहे. आता, पाटी धोरण आले आहे. संपूर्ण देशाचा अभ्यास करून धोरण तयार करत आहोत. राज्य सरकारतर्फे जे नवे धोरण तयार केले जात आहे, त्या धोरणाचे प्रारूप वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आले होते.

त्यावर २८५ सूचना आल्या असून त्यांचा समावेश धोरणात करण्यात आला आहे. सध्या हे धोरण वित्त विभागाकडे पाठविण्यात आले असून पुढील आठ दिवसांत हे धोरण जाहीर करण्यात येईल. ते अंतिम करण्याआधी आमदारांनी सूचना द्यावी, असेही बावनकुळे यांनी म्हटले.

### १५ दिवसांत वाळू उपलब्ध करुन देणे बंधनकारक

वाळू धोरणानुसार १५ दिवसांत तहसीलदारांनी घरकुलांना वाळू उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेत आहोत. १५ दिवसांत वाळू उपलब्ध न केल्यास तहसीलदारांवर कारवाई केली जाईल. नव्या वाळू धोरणात हे नमूद असेल, तसेच तक्रारीसाठी निश्चितच एक पोर्टल तयार केले जाणार आहे.

## संपादकीय

# नवीन बदल म्हणजेच मतदान बंदी

निवडणूक आयोगाने नव्या वादाला आमंत्रण दिले आहे. यावर्षी ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्याच्या अगदी तोंडावरच निवडणूक आयोगाकडून सघन सुधारणा कार्यक्रम राबवला जातो आहे. त्या अंतर्गत बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घरात जाऊन मतदारांची पडताळणी करणार आहेत.अचानक एवढी मोठी कवायत, एवढा कमी वेळ शिल्लक असताना सुरू केल्यामुळे इंडिया आघाडीतील राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस हे घटक पक्ष भडकले आहेत. असंख्य मतदारांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचाच हा प्रकार असल्याची टीका राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवरून आयोगावर अगोदरच काँग्रेसच्या गोटातून हल्ला तीव्र करण्यात आला आहे.आयोगाच्या विश्वासार्हतेवरच शंका घेतली जावी इतक्या थराला गोष्टी गेल्या असताना आयोगाने बिहारमध्ये सुरू केलेला नवा उपद्व्याप त्यांनाच अधिक संकटात नेणारा ठरणार आहे. इंडिया आघाडीतील ११ पक्षांच्या शिष्टमंडळाने बुधवारी निवडणूक आयोगाची भेट घेतली. मतदार यादीतील फेरफार हा मतदान बंदीचाच प्रकार असल्याचा आरोप आघाडीच्या नेत्यांनी केला आहे.आयोगासमोर जे प्रश्न आम्ही उपस्थित केले त्यातील एकाचेही उत्तर आम्हाला मिळाले नाही. त्यामुळे चिंता वाढल्या असल्याचे सीपीआय लिबरेशनचे दीपांकर भट्टाचार्य यांनी म्हटले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आयोगाच्या कामकाजाच्या संदर्भात लेख लिहून फार दिवस झालेले नाहीत. बिहारच्या निवडणुकीतही गडबड होऊ शकते, अशी शंका त्यांनी अगोदरच व्यक्त केली आहे.असे असतानाही आयोगाने मतदार यादी पडताळणीचे काम सुरू केल्यामुळे वाद पेटला आहे. आयोगाच्या हेतूबद्दलच तेजस्वी यादव शंका घेत आहेत. नव्या पडताळणीसाठी आयोगाने २००३ मधील मतदार यादी प्रमाण ठरवली आहे. तसेच येत्या २५ जुलैपर्यंत आपले सर्व काम उरकायचे असेही त्यांनी ठरवले आहे. त्यामुळे आगामी २० दिवसांत त्यांना हे सगळे आटोपायचे आहे.हीच मोठी भानगडीची गोष्ट असल्याचा संशय येतो. त्याचे कारण २००३ची जी यादी प्रमाण मानली जाणार आहे तिला तयार करायला त्यावेळी दोन वर्षे लागली होती. ते काम आता केवळ २५ दिवसांत कसे करणार, हा प्रश्नच आहे व तोच विरोधकांकडून विचारला जातो आहे. बरे आयोगाला हे करायचेच होते, तर मग त्यांनी लोकसभा निवडणूक झाल्यावर लगेचच हे काम का सुरू केले नाही?

आता विधानसभा निवडणुका होण्याची वेळ आल्यावरच त्यांना अचानक का जाग आली, असाही त्यांचा सवाल आहे. तोही अप्रस्तुत नाही. आयोगाच्या अनपेक्षित सक्रियतेमुळे केवळ राजकीय पक्षच नाहीत तर मतदारांमध्येही खळबळ माजली आहे. एकीकडे एवढी सखोल पडताळणी महिनाभराच्या आत करण्याचे दावे करून आयोग आपल्याच पूर्वीच्या भूमिकेच्या विसंगत अशी भूमिका घेतो आहे. याचेही त्यांना विस्मरण झाल्याचे दिसते. निवडणुका अनेक टप्प्यांत घेण्याची आयोगाची परंपरा राहिली आहे. त्याकरता आपल्याकडील मर्यादित मनुष्यबळाचे कारण त्यांच्याकडून दिले जाते. मग असे असेल तर आता इतक्या अल्प कालावधीत बिहारच्या तब्बल ७ कोटी ८९ लाख मतदारांच्या यादीत ते बदल कसा करणार आहेत? बिहार आर्थिक मागास राज्य आहे हे खरेच आहे.याच कारणास्तव रोजगारासाठी या राज्यातून देशाच्या अन्य भागांत लोक स्थलांतर करतात. एका अधिकृत आकडेवारीनुसार, ३ कोटी बिहारी अन्य राज्यांत रोजगारासाठी गेले आहेत. आयोगाच्या मागणीनुसार आता त्यांना जर आपले नाव मतदार यादीत टिकवायचे असेल तर दस्तावेज सादर करावे लागणार आहेत. ते जमवण्यासाठी त्यांना वेळच दिला गेलेला नाही. आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदार कार्ड हे ओळख आणि निवसाचे प्रमाण म्हणून स्वीकारणार नसल्याचेही सूचित केले गेले आहे. त्यामुळेच विरोधकांना यात मोठे काहीतरी शिजत असल्याचा संशय आहे. जे मतदार जुलै १९८७ च्या अगोदर जन्मले आहेत त्यांना त्यांचा जन्म कुठे आणि कधी झाला याचे पुरावे द्यावे लागणार आहेत. राज्याची आजची स्थिती पाहता १९८७ च्या अगोदरची काय स्थिती असेल याचा अंदाज सहज बांधता येतो. घरीच मूल जन्माला घालण्याची पद्धती आणि शिक्षणाचा अभाव पाहता आयोगाने निर्धारित केलेल्या वर्षाच्या अगोदरचा मतदार दस्तावेज आणणार कुठून आणि कसे हे मोठे कोडे आहे. ते मतदानापासूनच वंचित राहण्याची शक्यता अधिक आहे. सरकारी नोकरीत असणारे, पासपोर्ट धारक किंवा बँका, विमा, टपाल कार्यालय अथवा अन्य सरकारी संस्थेने जारी केलेले ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार आहे. मात्र, अशा लोकांची संख्या ती किती असणार आहे? जे सुशिक्षित आणि संपन्न आहेत त्यांना अडचण नाही; बाकी लोकांचे काय याचे उत्तर दिले गेलेले नाही. यातील मजेशीर भाग असा की २००३ नंतर जे मतदार जोडले गेले आहेत यातले ३७ टक्के लोक आपल्या या पडताळणी प्रक्रियेत प्रभावित होणार असल्याचे खुद्द आयोगालाही वाटते आहे. तरीही त्यांना ही मोहीम काही दिवसांत उरकायची आहे. योग्य व्यक्तीच मतदार यादीत असावेत याकरता गेल्या ७५ वर्षांपासून ही प्रक्रिया निरंतरपणे राबवली जाते आहे असे आयोगाचे म्हणणे आहे. या प्रकारची अंतिम पडताळणी झालेली यादी २००३ मध्ये तयार केली गेली होती असे नमूद करत आयोगाने ती आपल्या वेबसाइटवरही टाकली आहे. त्यानुसार ४.९६ कोटी मतदारांना कोणतेही दस्तावेज द्यावे लागणार नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, उर्वरित ३ कोटी मतदारांना ते द्यावे लागणार आहेत व त्यांचेच काम क्लिष्ट करून ठेवले आहे. त्यांना जर आयोगाच्या मागणीनुसार दस्तावेज सादर करता आले नाहीत तर ते अर्थातच ते मतदानाच्या प्रक्रियेतून बाजूला पडतील. हेच आयोगाला अपेक्षित आहे का?

# आत्मदीप हॉस्पिटलच्या किडनी प्रत्यारोपण शिबिरास चांगला प्रतिसाद

## ४५ रुग्णांची तपासणी, आठ रुग्णांवर होणार किडनी प्रत्यारोपण



नेवासा : नेवासाफाटा येथील आत्मदीप हॉस्पिटलमध्ये आयोजित किडनी प्रत्यारोपण शिबिराचे उदघाटन करताना संभाजीनगर येथील मुख्य किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ.समीर महाजन व डॉ.निखिल इंगळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजय रोटे, आत्मदीप फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अविनाश काळे, किशोर गारुळे, व्यवस्थापक प्रकाश शेटे.(छाया : सुधीर चव्हाण)

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नेवासा फाटा येथील आत्मदीप मेडिकल फाऊंडेशन व बजाज हॉस्पिटल (संभाजीनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत किडनी प्रत्यारोपण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ४५ किडनीग्रस्त रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये आठ किडनीग्रस्त रुग्णांची प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी निवड झाली असल्याची माहिती आत्मदीप फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अविनाश काळे यांनी दिली.

शिबिराच्या उदघाटनप्रसंगी संभाजीनगरच्या तज्ञ डॉक्टरांच्या समवेत खासदार संदीपान भुमरे, भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे उपस्थित होते. शिबिरात किडणीच्या सर्व आजारावरील तसेच डायलिसिस सुरू असणाऱ्या सर्व रुग्णांची मोफत तपासणी बजाज हॉस्पिटलचे मुख्य किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ. समीर महाजन व डॉ.निखिल इंगळे, डॉ बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॉर्ज फर्नाडिस, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय रोटे यांनी केली. शिबिरामध्ये सुमारे ४५ किडनी विकारग्रस्त रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी ८ सुयोग्य रुग्णांची तात्काळ किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियासाठी निवड करण्यात आली असून वरील सर्व रुग्णांवर किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया सर्व शासकीय परवानग्या घेऊन पुढील महिनाभरात करण्यात येतील असे शिबिर संयोजक डॉ.अविनाश काळे यांनी सांगितले.

शिबिर यशस्वीतेसाठी डॉ.अविनाश काळे, आत्मदीप फाऊंडेशनचे विश्वस्त अॅड. प्रियंका काळे, दादासाहेब कोकणे, विनोद ठाणगे, डॉ. किरण ढगे, डॉ. नरेंद्र भदगले, डॉ. पार्थ मरकड, व्यवस्थापक प्रकाश शेटे, मेडिकल विभागाचे ओम कोकणे, कर्मचारी गणेश मोहिते, आरोग्य कर्मचारी, सिस्टर यांनी विशेष प्रयत्न केले.

### आ. लंघेंना धन्यवाद

**शिबिरात मिळालेल्या डोनरनुसार आठ रुग्णांची संभाजीनगर येथील बजाज हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आगे. त्यामुळे या रुग्णांना जीवदान मिळणार आहे, शासनाच्या माध्यमातून आमदार लंघे यांनी रुग्णांवर मोफत किडनी प्रत्यारोपण करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल रुग्णांच्या नातेवाईकांनी त्यांना धन्यवाद देत आभार मानले.**

# शेकडो भाविकांनी घेतले पुरातन सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुका आर्ट ऑफ लिविंग परिवाराने आयोजित केलेल्या एक हजार वर्षा पूर्वीचे पवित्र मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंग रूद्र पूजा दर्शन व सत्संगसोहळा भक्तीमय वातावरणात झाला. भाविकांनी ज्योतिर्लिंग दर्शन व सत्संगसोहळयाचा लाभ घेतला.

उत्सव मंगल कार्यालयात मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगासमवेत स्वामी वैष्णव पावन यांच्या उपस्थितीत ओम नमः शिवाय मंत्राचा जप करत सोहळ्यास प्रारंभ झाला. सुरुवातीस गुरुपूजा, रुद्रपूजा, रुद्र अभिषेक करण्यात आला. स्वामींनीजप्राचीन ज्योतिर्लिंगाचे महत्व, त्याचा इतिहास सांगितला. अकराव्या शतकात महमूद गझनीने सोमनाथ मंदिरावर चढाई केली आणि पवित्र शिवलिंगाचे तुकडेतुकडे केले. पण काही निष्ठावंत पुजाऱ्यांनी गुपचूप त्याचे काही अवशेष वाचवले. त्याला लिंगाचा आकार देत त्यांनी आपल्या जीवावर




उदार होऊन लपवले आणि पिढ्यानपिढ्या हे रहस्य जपले गेले. जवळपास एक हजार वर्षे, हे अवशेष गुप्त ठिकाणी सुरक्षित राहिले. भक्तांच्या श्रध्देने जिवंत ठेवले गेले. कालांतराने, हे दिव्य अवशेष गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्यापर्यंत पोहोचले. गुरुदेवांनी त्यांचे आध्यात्मिक महत्व ओळखून भक्तांसाठी महाशिवरात्रीच्या बंगलोर आश्रमात लिंगभिषेक केला. भाविकांना दर्शन दिले व आज भारतभर या मुळ सोमनाथ ज्योतिर्लिंगचे भाविकांना दर्शन घडत आहे.

सोहळ्यास माजी आमदार, माजी, नगराध्यक्ष, नगरसेवक, डॉक्टर, वकील, पत्रकार, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, श्रीरामपूर, नेवासा, राहुरी, राहाता येथील आर्ट ऑफ लिविंगचे सर्व साधक प्राशिक्षक तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी, भाविक उपस्थित होते.

# सुरेगावच्या शिवमंदिराचा रस्ता अखेर पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील रोडलगत असणारे नन्नवरे यांच्या शेतातील शिव मंदिरात जाण्यासाठी असलेला रस्ता सुरेगाव ग्रामपंचायतीने नुकताच सिमेंट काँक्रीटचा केला आहे. शिवभक्तांची मागणी पूर्ण झाल्यामुळे सुरेगावसह पंचक्रोशीतील शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी सुरेगावच्या प्रथम लोकनियुक्त सरपंच सुमन कोळपे, उपसरपंच.सीमा कदम व सर्व सदस्यांचे आभार मानले आहे.

सुरेगाव येथील भगवान शिवाचे मंदिर सुरेगाव व परिसरातील शिवभक्तांचे आराध्य दैवत आहे. परंतु रोड पासून या मंदिरापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ओबड धोबड रस्त्याने तर पावसाळ्यात चिखल तुडवत जावे लागत होते. शिवभक्तांना होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन सरपंच कोळपे, उपसरपंच कदम व सर्व सदस्यांनी केलेल्या सहकार्यातून तब्बल नऊ लाख रुपये निधी देऊन हा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्यात आला असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी दिगंबर बनकर यांनी दिली.

जवळपास चाळीस वर्षापूर्वी सुरेगाव येथे नन्नवरे कुटुंबाने आपल्या शेतात शिवमंदिर बांधल्यामुळे दर सोमवारी तसेच श्रावण महिन्यात व महाशिवरात्रीला दर्शनाला येणाऱ्या व पूजा-अभिषेक करणाऱ्या भाविकांची संख्या खूप मोठी होती. मंदिराच्या पाठीमागेच भगवान शंकराला आवडणाऱ्या बेलाचे झाड असल्यामुळे भाविकांना बेलाच्या पानाची अडचण येत नसल्यामुळे भाविक नियमितपणे दर्शनासाठी येत असतात. श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे यावर्षी श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी होणार आहे.

# सर्वरोग निदान शिबिरात २५० रुग्णांची तपासणी व औषधोपचार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** प्रवरा मेडिकल ट्रस्ट, ग्रामपंचायत पिंप्री लौकी अजमपूर, जनसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबिरामध्ये २५० रुग्णांची विविध आजारांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले .




शिबिराचे उदघाटन सरपंच संगीतागीते यांनी केले. जनसेवा मंडळाचे अध्यक्ष भारतराव गीते म्हणाले की, ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील महिला, वृद्ध व बालकांना आरोग्याच्या सुविधा मिळण्याची मोठी अडचण होत होती. मात्र नामदार विखे पाटील व प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र विखे यांच्या प्रयत्नाने पिंपरी गावामध्ये प्रवरा ग्रामीण आरोग्य केंद्र सुरू करून रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार केले जातात. शिबिरामध्ये २५० रुग्णांची तपासणी करून विविध आजारांवर उपचार करण्यात आले तर ४०गंभीर आजार असणाऱ्या रुग्णांना प्रवरा हॉस्पिटलच्या माध्यमातून भरती करण्यात आले व त्यांना मोफत उपचार देण्यात आले.

याप्रसंगी विविध विभागाचे डॉक्टर उपस्थित होते तसेच प्रवरा मेडिकलचे अधिकारी यांनी परिश्रम घेतले. शिबिराप्रसंगी भाऊसाहेब लावरे, प्रा कान्हु गिते, भाऊसाहेब मुंढे, रामदास दातीर, संजय बिडवे, कैलास खेडकर, मेजर सुनील गिते, विजय कदम, तान्हाजी गिते, लक्ष्मण गिते, भास्करराव दातीर, आव्हाड गणपत, नाना गिते, रमेशराव कदम आदी उपस्थितित होते

# आषाढीला भाविकांची गैरसोय करू नका : आ. क्षीरसागर

**बीड :** आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी, अशा सूचना आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

रविवारी (दि.६) आषाढी एकादशी आहे. एकादशीनिमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच अनेक भाविक पंढरपूरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ. क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्रीक्षेत्र नारायणगडावर जाण्या-येण्यासाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्रीक्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्रीक्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शनरांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच तेथे आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्यपथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. ४, ५, ६, ७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधीक्षक अभियंता यांना आ. क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

# आई-वडील व शाळेला कधीच विसरू नका : माने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे :** आयुष्यात आपण कितीही मोठे व्हा, कितीही मोठ्या पगाराची नोकरी, व्यवसाय, करा. पण या यशामागील खरे मानकरी असलेले आई-वडील, जिथे शिक्षण घेतले त्या शिक्षण संस्थेला कधीच विसरू नका असा संदेश प्रेरणादायी वक्ते घनश्याम माने यांनी दिला.




मातोश्री राधा फार्मसी कॉलेज वीरगावच्या विद्यार्थी निरोप समारंभात ते बोलत होते. चतुर्थ वर्ष बीफार्मसी, द्वितीय वर्ष डीफार्मसीच्या कॅम्पस इंटरव्यूमधे निवड झालेल्या ३५ विद्यार्थ्यांचा तसेच डिप्लोमा व डिग्री अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य मिळविलेल्या व आदर्श विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी आनंदगड शैक्षणिक संकुलाचे सचिव डॉ. अनिल रहाणे होते. संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, जेष्ठ नेते आरीफ तांबोळी, सचिन शिंदे, केरू वाकचौरे, अनिल डोळस, निलेश वाकचौरे, शिवराज वाकचौरे, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्रा. प्रतीक्षा रहाणे आदी उपस्थित होते. माने म्हणाले की, नवीन वाटचालीसाठी सुरुवात करत असताना नेहमी आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या घटकांची आठवण ठेवली पाहिजे. आपले मित्र, शिक्षक, जिथे शिकलो ती शाळा, कॉलेज व सर्वात महत्वाचे आपले आईवडील यांना कधीही विसरू नका. अनिल रहाणे, प्राचार्या फलके, प्रा. मनिषा शेरमाळे, प्रा प्रवीण शेळके, प्रा. कनकधर अभिलाष, प्रा. वैभव गाढवे, प्रा. कल्याणी म्हैसमाळे, प्रा. प्रिया आंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक प्रा. रेश्मा आढळ यांनी, सूत्रसंचालन प्रा. ऋतुजा भांगरे यांनी केले. यावेळी प्रा. मयुरी मुंढे, काजल धुमाळ, प्रा. आकाश इंद्रेकर, प्रा. सोनाली भांगरे, उर्मिला मिंढे, विद्या वाकचौरे, रोहिणी निकम, सुधीर गांडोळे, राहुल तोरमल, कामिनी देशमुख उपस्थित होते.

# बीड जिल्हा अन्याय अत्याचारग्रस्त घोषीत करा : तुरुकमारे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** जिल्ह्यात नवनीत कावत यांनी पोलीस अधीक्षकपदाचा पदभार घेतल्यापासून आजपर्यंत जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून महिलांवरील अन्याय-अत्याचारांत वाढ झालेली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयात बसून फक्त आदेश देण्याचे काम करीत आहेत, अनुचीत प्रकार घडल्यास ते तात्काळ भेट देत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत चालली आहे. अनुसुचित जातीजमातीमधील महिला यांना मारहाणीचे प्रकार, विनयभंगाचे प्रकार, जातीवाचक शिवीगाळीचे प्रकार घडले आहेत. गुन्हा दाखल होऊनही कार्यवाही न करता दुर्लक्ष केले जात आहे. कावत यांची बदली मुंबई येथील पोलीस मुख्यालयाच्या नियंत्रण कक्षात करण्यात यावी वल बीड जिल्हा अन्याय, अत्याचारग्रस्त घोषीत करा, अशी मागणी, अनिल तुरकमारे यांनी केली आहे.

माजी आमदार संगीता ठोंबरे, विजयप्रकाश ठोंबरे, तत्कालीन जात पडताळणी सदस्य सचिव रविकांत शिंदे, राजकुमार व्हावळे या सर्वांनी संगनमत करुन महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच काही नोकरदार यांचे जात वैद्यता प्रमाणपत्र जात पडताळणी विभागाकडून चुकीच्या पध्दतीने हस्तगत करुन लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगीरणीचे परस्पर सभासद दाखवले आहेत. त्यात माझा मुलगा ऋषीकेशचाही समावेश आहे. याबाबत चौकशी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांना देण्यात आले होते. पोलीस अधीक्षकांनी अप्पर पोलीस अधीक्षक तिडके यांच्या अधिपत्याखाली विशेष चौकशी समिती नेमण्यात आली. चौकशी समितीने चौकशी करुन अडीच महिन्यांपूर्वी अहवाल दिला आहे. परंतु पोलीस अधीक्षकांनी किरकोळ मुद्दे काढून फेरचौकशीचे आदेश काढले आहेत. अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी अनेकवेळा भेटूनही ते संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याचे टाळत असल्याचा आरोप तुरकमारे यांनी केला.चौकशी अहवालाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा व बीड जिल्हा अन्याय आणि अत्याचारग्रस्त घोषीत करण्यात यावा या मागणीसाठी त्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Bahasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818

द•ख•ल

## आषाढी एकादशीची पुणतांबा येथे जय्यत तयारी

**पुणतांबा** : महाराष्ट्राची दाक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथे आषाढ महिन्यातील देवशयनी एकादशीनिमित्त भरणाऱ्या यात्रेसाठी योगीराज चांगदेव महाराज देवस्थानाच्यावतीने ज्य्यत तयारी सुरु करण्यात आल्याची माहिती विश्वस्त महेश मुरुदगण यांनी दिली. ज्या भाविकांना विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जाणे शक्य नसते असे भाविक श्रीक्षेत्र पुणतांबा येथे योगीराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. सध्या गोदावरी भरून वाहत असल्यामुळे भाविकांना गंगास्नानाचा लाभ घेता येणार आहे. भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे म्हणून देवस्थानमार्फत सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे एकादशीनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहितीही मुरुदगण यांनी दिली.

## अपघातातील जखमी विद्यार्थ्यांना तातडीची मदत

**संगमनेर** : चंदनेश्वर विद्यालयाची स्कूल बस विद्यार्थ्यांना घेऊन येत असताना घाटामध्ये सुरू असलेल्या एकेरी वाहतुकीमुळे ही स्कूलबस साईड गटारामध्ये पलटली. यामध्ये चार-पाच विद्यार्थ्यांना जखमा झाल्या असून ही बातमी कळताच माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या यंत्रणा व कार्यकर्त्यांना तातडीने मदतीच्या सूचना दिल्या असून इंद्रजीत थोरात यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची चौकशी केली. काल सकाळी विद्यार्थ्यांना चंदनेश्वर विद्यालयात घेऊन येत असताना चंदनापुरी घाटामध्ये समोरून येणाऱ्या वाहनाने हुल दिल्याने स्कूल बस साईड गटारामध्ये गेली. यामुळे चार-पाच विद्यार्थ्यांना जखमा झाल्या. अपघाताची बातमी कळताच थोरात यांनी आपले सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना तातडीने या विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या. इंद्रजीत थोरात, विजय राहणे यांनी तातडीने घटनास्थळाला भेट दिली. र विद्यार्थी डॉ. राधेश्याम गुंजाळ हॉस्पिटल येथे ॲडमिट असून या विद्यार्थ्यांची त्यांनी आपुलकीने चौकशी केली.

# अनुसूचित जाती-जमातीसाठी स्वतंत्र आयोग आवश्यकच होता : आ. तांबे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : आदिवासी समाज हा जल, जंगल आणि जमीन यांच्यावर खऱ्या अर्थाने अधिकार असलेला मूळनिवासी समाज आहे. अनुसूचित जाती जमाती, बारा बलुतेदार, १८ पगड समाज या सर्वांच्या विकासासाठी ठोस उपाययोजना गरजेचे असून आदिवासी विभागातील परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता स्थापन करण्यात आलेला स्वतंत्र आयोग हा अत्यावश्यकच होता, अशा शब्दात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी या आयोगाचे स्वागत केले असून राज्यातील आदिवासी विभागातील अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

विधान परिषदेच्या अधिवेशनात अनुसूचित जाती आणि जमातींसाठी स्वतंत्र आयोगावरील चर्चेत ते बोलत होते. आदिवासी बांधवांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी हा आयोग काम करणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांसह चोपडा तालुका तसेच तापी खोऱ्यामध्ये आदिवासी बांधव मोठ्या संख्येने आहे. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, सटाणा, त्रंबकेश्वर या भागासह अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव राहत आहेत. आदिवासींचे अनेक प्रश्न असून छत्तीसगड, मध्यप्रदेश या ठिकाणी यापूर्वीच अनुसूचित जाती व जमातींसाठी स्वतंत्र आयोग केला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार १२ टक्के मागासवर्गीय व ९.५ टक्के आदिवासी समाज देशात आहेत. १८ पगड जाती १२ बलुतेदार यांच्यासाठीही या आयोगाकडे स्वतंत्र प्रश्न मांडले जाणार आहेत. त्यांना न्याय मिळेल यासाठी आयोगातून काम होणार आहे.

राज्यामध्ये विविध आयोगाच्या कामकाजाचे परीक्षण झाले पाहिजे महिला आयोगाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पुण्यामध्ये महिला असुरक्षित असून या आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. आदिवासी विभागात परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. याचप्रमाणे आदिवासी आश्रम शाळा, वस्तीग्रह यांची परिस्थितीसुद्धा वाईट आहे. विद्यार्थ्यांना कोणत्याही सुविधा नाही. या सर्वांचे थर्ड पार्टी ऑडिट झाले पाहिजे. आदिवासी भागातील रस्ते आणि विकासाची कामे निकृष्ट दर्जाची होत असतात. या आयोगामार्फत अशा ठेकेदार, भ्रष्टाचारी अधिकारी या सर्वांवर कारवाई करण्याचा अधिकार दिला गेला पाहिजे. फक्त सुनावण्या घेण्यासाठी आयोग नको असे सांगताना जल,जमीन, जंगल हा आपला अभिमान असून देशाच्या प्रगतीमध्ये १८ पगड जाती व बारा बलुतेदार यांचीही मोठे योगदान असून या सर्वांच्या विकासासाठी या आयोगामार्फत काम होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दिनकर यांची बदनामी सहन करणार नाही



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर उत्तरचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांची तृप्ती देसाई यांनी सोशलमीडियावर व विविध प्रसारमाध्यमांतून आक्षेपार्ह व्हिडीओ व बातम्या पसरवून बदनामी केली आहे. हा प्रकार केवळ नितीन दिनकर नव्हे, तर संपूर्ण मातंग समाजाच्या अस्मितेवर थेट आघात करणारा असल्याने त्यांची बदनामी सहन करणार नाही, असा इशारा विविध संघटनांच्यावतीने प्रशासनाला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मातंग अस्मिता संघर्ष सेना लहुजी शक्ती सेना, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे समिती, आरपीआय मातंग आघाडी व सर्व मातंग समाजबांधव एकजुटीने दिनकर यांच्या माघे उभे आहेत. शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. मातंग समाज दलित म्हणूनच वारंवार अन्यायाचा सामना करत आला आहे. ही बदनामी केवळ नितीन दिनकर यांची नाही, तर संपूर्ण मातंग समाजाच्या प्रतिष्ठेवर डाग आणणारी आहे. यापुढे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. दोषींवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा संपूर्ण मातंग समाज आणि दलित बांधवांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.यावेळी विजय शेलार (माजी सभापती, बाजार समिती), भागचंद नवगिरे (जिल्हाध्यक्ष, मातंग अस्मिता संघर्ष सेना), बंडूकुमार शिंदे (जिल्हाध्यक्ष, सांस्कृतिक सेल भाजप), मोहन आव्हाड (जिल्हाध्यक्ष, मातंग आघाडी आरपीआय), लहूभाऊ खंडागळे (तालुकाध्यक्ष, लहुजी शक्ती सेना), सतीश सौदागर, विठ्ठल गालफाडे, मोहन आडागळे, विलास जाधव, विजय पवार, विशाल लाहुंडे व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बहिरेपणावर प्रेशर पॉईंट थेरपी प्रभावी : डॉ. होन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव** : देश-विदेशात बहिरेपणाचे अनेक रुग्ण आहेत. अतिरिक्त मोबाईलचा वापर, ध्वनी प्रदूषण व वयानुसार आलेल्या बहिरेपणावर वेळेत व यशस्वी उपचार केला तर बहिरेपणावर मात करता येते. होमिओपथी औषध व प्रेशर पॉईंट थेरपीने देशासह परदेशातही बहिरेपणा आलेल्या अनेक रुग्णांवर यशस्वी उपचार केले. त्यामुळे रुग्णांना फायदा झाला. हजारो रुग्णांनी बहिरेपणावर मात केली असल्याचे डॉ. नानासाहेब होन यांनी सांगितले. डॉ. होन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. मात्र आज त्यांच्या याच शिक्षणाचा उपयोग गरजू रुग्णांना होत आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील व सिक्कीम राज्याच्या मुख्यमंत्री प्रेमासिंह तमंग यांनी त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित केले. डॉ. होन यांना राजीव रत्न पुरस्कारदेखील मिळाला आहे. शिर्डी परिसरातील बहिरेपणा आलेल्या रुग्णांच्या उपचारासाठी डॉ. होन उद्या (शनिवार) सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुखधाम हॉस्पिटल शिर्डीयेथे उपलब्ध असणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाच्यावतीने सांगण्यात आले. बहिरेपणा आलेल्या रुग्णांनी पासणी व उपचाराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महिलांसाठी मोफत वेलनेस सेंटर सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : शहरातील अहिल्यानगर प्रभागामध्ये वेलनेस सेंटरच्या आरोग्य सल्लागार मन्नाबी शेख-बागवान यांनी सूरू केलेल्या माऊली वेलनेस फिटनेस सेंटरचे उदघाटन वेलनेसचे बीड येथील मुख्य प्रशिक्षक सलीम शेख यांच्या हस्ते व महिलांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बीड येथील आदिनाथ खेडकर,आरोग्य सल्लागार भाऊसाहेब येवले, प्रशिक्षिका गीता गायकवाड, प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण, दत्तात्रय गायकवाड, जिम ट्रेनर शाहरुख, विशाल इंगळे, होमगार्ड शकील शेख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. बागवान यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. यावेळी सय्यद भाभी, रिटा इंगळे, पुजा अनारसे, वर्षा परदेशी, मीना लोखंडे, मगंल घोडके, नंदा उगले, योगिता केदंळे, कल्पना जगताप, प्रतिभा चक्रनारायण, सुवर्णा गायकवाड, बेबी आदमने, सुवर्णा शिंदे, सिंधू शूळ यांच्यासह अहिल्यानगर प्रभागातील महिला उपस्थित होत्या. संयोजक मन्नाबी शेख यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय ज्ञानाची संधी द्या : आ. सत्यजित तांबे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राज्यातील तरुण व प्रगतशील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अनुभव घेता यावा यासाठी कृषी विभागाकडून यापूर्वी परदेशी अभ्यासदौरे आयोजित केले जात होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून हे दौरे पूर्णतः थांबले असून त्यामुळे शेतकरीवर्गात नाराजी पसरली आहे. हे अभ्यास दौरे पुन्हा सुरू करून शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरचे ज्ञान मिळावे, यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी विधानपरिषदेत ठामपणे आवाज उठवला आहे.

यापूर्वी कृषी विभागाच्यावतीने राज्यातील निवडक शेतकऱ्यांसाठी परदेशी अभ्यास दौरे आयोजित केले जात होते. लॉटरी पद्धतीने अर्जांची निवड करून शेतकऱ्यांना अमेरिका, इज्रायल, नेदरलँड्स, जपान यांसारख्या देशांमध्ये शेती, प्रक्रिया उद्योग, सिंचन व्यवस्थापन, सेंद्रिय शेती आणि तंत्रज्ञान आधारित शेती पद्धतींचा अभ्यास करण्याची संधी दिली जायची. या दौऱ्यांचा राज्यातील शेती क्षेत्रावर सकारात्मक प्रभाव पडला होता. अनेक शेतकऱ्यांनी परदेशातून शिकलेले तंत्रज्ञान आपल्या शेतात राबवले आणि उत्पादन, प्रक्रिया व विपणन व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणली. मात्र, मागील काही वर्षांपासून हे दौरे पूर्णपणे थांबले आहेत. परिणामी तरुण शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. आधुनिक शेतीच्या दिशेने त्यांना चालना मिळावी आणि आंतरराष्ट्रीय अनुभवातून नव्या संधींचा लाभ घेता यावा, यासाठी हे दौरे पुन्हा सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे, असे तांबे यांनी सभागृहात स्पष्ट केले.

# १०१ किलो पेढे वाटून मुरदारे कुटुंबाची नवसपूर्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे सहकारी देवगड येथील बाबासाहेब मुरदारे यांनी १०१ पेढयांचे वाटप करून आई जगदंबेला केलेल्या नवसाची नवसपूर्ती केली. शिरसगाव येथे खासदार संदीपान भुमरे व भाजपचे नेते माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते जगदंबा मातेला पेढे अर्पण करण्यात आले.

विठ्ठलराव लंघे हे आमदार व्हावेत म्हणून १०१ किलो पेढयांचा नवस मुरमे देवगड येथील त्यांचे निकटवर्तीय सहकारी बाबासाहेब मुरदारे यांनी शिरसगाव येथील जगदंबा देवीला केला होता. आ. लंघे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १०१ किलो पेढे वाटप करून ही नवसपूर्ती विखे भुमरे, आमदारलंघे यांच्या हस्ते जगदंबा मातेची पूजा करून देवीला पेढे अर्पण करून मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, ऋषिकेश शेटे, शिवसेनेचे संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, राजेंद्र शेटे यांच्यासह मुरदारे परिवारातील बाबासाहेब मुरदारे, शुभम मुरदारे, प्रसाद मुरदारे, गणेश मुरदारे,अमोल मुरदारे दांपत्य उपस्थित होते.

# 'खरीप पिकांसाठी आवर्तन सोडावे'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यात उद्दिष्टाप्रमाणे खरीप पिकांची पेरणी झालेली आहे. मात्र पेरणीनंतर पावसाने उघडीप दिल्याने उगवण झालेली कोवळी पिके पाण्याअभावी माना टाकू लागली आहेत. भंडारदरा- निळवंडे धरणात नवीन पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने खरिपाची पिके वाचवण्यासाठी धरणातून शेती आवर्तन सोडण्यात यावे, आशी मागणी माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, संत सावता सोसायटीचे अध्यक्ष बाबासाहेब तनपुरे, शेतकरी श्रीधर गाडे यांनी केली आहे.

अवकाळी पावसाने मे महिन्यातच दमदार हजेरी लावली होती. त्यामुळे पेरणीपूर्व मशागती चांगल्या झाल्याने खरीप पेरणीसाठी मृग नक्षत्राची वाट पाहिली जात होती. मृग नक्षत्राच्या पूर्वसंध्येलाच पेरणीयोग्य दमदार पाउस झाल्याने सोयाबीन, बाजरी, मका, भुईमूग, मूग व चारा पिकांची पेरणी झाली होती. मात्र पेरणी होताच पावसाने गेल्या २०-२५ दिवसांपासुन दडी मारली आहे. पिकांची उगवण चांगली झाली आसली तरी सध्या पाऊस नसल्याने पिके कोमेजून जाताना दिसत आहेत. महागडी खते व बियाणे खरेदी करुन ती मातीआड केल्याने मोठा भांडवली खर्च झालेला आहे. विहिरी व बोआरवेलची पाणीपातळीही मोठ्या प्रमाणात घटलेली आहे. त्यातच विजेच्या लपंडावाचा खेळ सुरु आहे. शेतीसाठीची आठ तासाची वीज जेमतेम चार तासच सुरळीत चालते. त्यामुळे जेमतेम पाणी व विजेचा लपंडावामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे. भंडारदरा व निळवंडे धरणात समाधानकारक पाणीसाठा शिल्लक आसल्याने त्यातून जलसंपदा विभागाने तातडीने शेती आवर्तन सोडावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# तनिष्क आफळेचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूनी केला सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाच्या आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलाच्या तनिष्क आफळे याने टाटा बिल्डिंग इंडिया निबंध स्पर्धे त राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले. त्याचा नुकताच राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. टाटा बिल्डिंग इंडियाच्यावतीने पालक दत्तात्रय आफळे यांच्यासह तनिष्क आफळे याला दिल्ली विमान प्रवास, निवास, भोजन, राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे राष्ट्रपतीच्या हस्ते सन्मानपत्र. मेडल, तीस हजारांचे गिफ्ट व्हाउचर देऊन सन्मानित करण्यात आले.

टाटा बिल्डिंग इंडिया आयोजित निबंध स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर मराठी भाषेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तनिष्क आफळे यांच्या माध्यमातून आत्मा मालिक शैक्षणिक संकुलाला मिळाली हा अभिमानाचा क्षण आहे. असे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले विद्यार्थ्यांचे सर्वांगसुंदर, सर्वगुणसंपन्न, व्यक्तीमत्त्व घडवण्यासाठी आत्मा मालिक सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी केले.तनिष्कला विभाग प्रमुख सचिन डांगे, पर्यवेक्षक गणेश रासने, शिक्षक राजेंद्र जाधव, भैरवनाथ कुंभार, रीना पवार, सुवर्णा ढगे, पंकज गुरसळ, विद्या खोसे, मोनाली गोडगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतीगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, वसतिगृह व्यवस्थापिका मीरा पटेल, प्राचार्य निरंजन डांगे यांनी अभिनंदन केले.

# घरकुल परिसरात गटारसफाईचा गंभीर प्रश्न; शिवसेनेचे निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : शहरातील प्रभाग क्रमांक ८ अंतर्गत येणाऱ्या अखंडानंद दत्तमंदिर मागील घरकुल ते भीमरत्न चौक घरकुल परिसरातील मुख्य गटार (नाला) पूर्णपणे गाळाने भरली असून, त्यातून पाणी सांडून थेट घरांमध्ये प्रवेश करण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरात डासांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यासारख्या आजारांचा धोका वाढत आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्यावतीने काल (शुक्रवार) मुख्याधिकारी, आरोग्य विभाग प्रमुख यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दत्तमंदिर मागील घरकुल ते भीमरत्न चौक घरकुल भागातील नाल्यांमध्ये गेले अनेक महिने गाळ साचलेला असून, याकडे नगरपरिषद व संबंधित आरोग्य विभागाचे लक्ष गेलेले नाही. पावसामुळे ही गटारे तुंबून पाणी घरांमध्ये जात आहे. त्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत असून, सार्वजनिक आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. घरकुल परिसरातील अनेक महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले यांना या दुर्गंधीने, तसेच डासांमुळे त्रास होत असून विषाणूजन्य आजारांचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे.निवेदनावर शिवसेनेचे माजी शहरप्रमुख सुधीर वायखिंडे, राजेंद्र भोसले, संतोष चव्हाण, बबन अवसरमल, सचिन दळवी, शंकर जाधव, साई चव्हाण, संतोष पोपळघट, परसराम अवसरमल, किशोर निकाळजे, शब्बीर शेख, बलराम अवसरमल, योगेश ससाणे, मालन निकाळजे, सविता चव्हाण, गुंफाबाई वाल्हेकर, मनिषा खरात, सुगंधा अवसरमल, अनिता नरोडे, शोभा गोंधवणे, शांताबाई जाधव, दुर्गाबाई ठोकळ, पोपळघट यांच्या सह्या आहेत.


**सहकार महर्षी कै.गणपतराव रभाजी औताडे पा.सामाजिक व शैक्षणिक मंडळ संचालित, हिंदुहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,पोहेगाव**

**पाहिजेत :- थेट मुलाखत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,संलग्नित आमच्या वरिष्ठ महाविद्यालयात विना अनुदानित तात्पुरत्या स्वरूपात तासिका तत्वावर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी पदवी वर्गासाठी सहाय्यक प्राध्यापकांची खालील रिक्त पदे भरावयाची आहे.इच्छुक पात्र उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेच्या मूळ आणि छायांकित प्रतिसह पोहेगाव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगाव, शाखा-पोहेगाव येथे बुधवार दि.०९/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.न. | विषय | पदसंख्या | अ.न. | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्लिश | १ | ७ | वाणिज्य | ३ |
| २ | मराठी | २ | ८ | रसायनशास्त्र | २ |
| ३ | राज्यशास्त्र | १ | ९ | वनस्पतीशास्त्र | १ |
| ४ | अर्थशास्त्र | २ | १० | प्राणीशास्त्र | १ |
| ५ | भूगोल | १ | ११ | शारीरिक संचालक | १ |
| ६ | इतिहास | १ | १२ | ग्रंथापाल | १ |

टीप :- १)नेट/सेट/पी.एच.डी.उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य २) मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना प्रवास/दैनिक भत्ता दिला जाणार नाही .

संपर्क :-८४२००९००६०/९४०४४०२२८७

सचिव

सहकार महर्षी कै.गणपतराव रभाजी औताडे पा. सामाजिक व शैक्षणिक मंडळ,पोहेगाव


# विविध मूलभूत समस्यांमुळे शारदानगरमधील नागरिक त्रस्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरातील शारदानगर परिसरात सांडपाणी, अपूर्ण रस्ते, स्वच्छतेचा अभाव आणि डासांच्या वाढलेल्या साम्राज्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या समस्यांबाबत नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील रहिवासी डॉ. कुणाल घायतडकर, अमोल गिरमे व स्थानिक नागरिकांनी मुख्याधिकारी सुहास जगताप यांना निवेदन देऊन समस्या सोडविण्याचे साकडे घातले.

निवेदनात म्हटले आहे की, शारदानगर भागातील नाल्यांची दुरावस्था झाल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने नाल्यांची साफ सफाई करावी. एस.एस.जी.एम. कॉलेजच्या मागील बाजूस साचलेल्या सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून निचरा होण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्या. देवी मंदिर आणि दत्त मंदिर परिसर स्वच्छ करून कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. आ. काळे यांनी शारदानगर परिसरातील श्रीनगर, शारदानगर, एस.एस. जी.एम.महाविद्यालय रोड रस्त्यांना निधी देऊन या रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. परंतु अद्यापही या रस्त्यांची कामे संबंधित ठेकेदाराकडून सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे या रस्त्यांची कामे त्वरित सुरु करावीत. काही रस्त्यांची अवस्था खूपच खराब झाली असून नागरिकांना रोजच्या दैनंदिन वापरात असेलेल्या रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याने जंतुनाशक औषध फवारणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते अमोल गिरमे यांनी प्रभाग क्र. ४ च्या अंबिकानगर परिसरातील अंतर्गत रस्ते व गटार मंजूर असूनही हे काम अपूर्ण असल्याचे मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्या निदर्शनास आणून देत रस्ते व गटारीचे काम न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी अशी मागणी केली. यावेळी आण्णासाहेब शिंदे महाराज, अशोकराव नरोडे, संजय थांगे, अशोक टेंबरे, बाबुराव कुटे, दिग्विजय शेळके, एकनाथ चव्हाण, नेहा शिंदे, प्रतिक्षा पारळकर, हसन शेख, ओंकार ठोंबरे, निखिल मढवई, लतीफ शेख, राजेंद्र सूर्यवंशी, मनोज देवठाक, दत्तू पवार, अशोक आवारे, बबनराव आभाळे, शेरू शेख, राजेंद्र निकम, ए.आर.औताडे, मच्छिंद्र गोर्डे, सुरेश मोरे, संजय नळे आदी उपस्थित होते.


**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/३०/२०२५
नेवासा दिनांक. ३०/०६/२०२५

अर्जदार श्री/श्रीम- आकाश मच्छिंद्र बर्डे रा. खरवंडी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. रणविजय आकाश बर्डे यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-रणविजय आकाश बर्डे, गावाचे नाव- खरवंडी, जन्म दिनांक-१७/०७/२०१९

करिता या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिखदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**



**जाहीर निविदा सूचना**

मौजे कोल्हार बु।। ता. राहाता, जि. अहमदनगर हे खाली नमुद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत मजुर संस्था/नोंदणीकृत अभियंता/ठेकेदार यांचेकडून ब-१ निविदा मागवित आहेत. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालय मौजे कोल्हार बु।।, ता. राहाता येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत रुपये ५६०/- रोखीने भरुन प्राप्त होतील दि. ०७/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या निविदा दि. १५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा.पं. कार्यालयात शक्य झाल्यास हजर असणारे ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | निविदा रक्कम | इसारा रक्कम | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोल्हार बु येथील बाळू भगत गल्ली ते चर्च परिसर येथे आर सी सी पाईप गटार करणे | १५ वा वित्त आयोग २४/२५ | ५९३१३८/- | सूट | सुबे |
| २ | मौजे कोल्हार बु.येथे शौचालय दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग २४/२५ | ४६६२७८/- | सूट | सुबे |
| ३ | मौजे कोल्हार बु. येथे पाणी पुरवठा प्रणालीचे संचालन व देखभाल दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग २४/२५ | २७०९०३/- | सूट | सुबे |
| ४ | मौजे कोल्हार बु. येथे बेलापुर रोड येथे पाईप लाइन करणे | १५ वा वित्त आयोग २४/२५ | ४१९६०१/- | सूट | सुबे |
| ५ | मौजे कोल्हार बु. येथे राजुरी रोड जुना नांदूर रस्ता पाइपलाईन करणे | पाणी पुरवठा योजना २५/२६ | २५१५२०/- | सूट | सुबे |

**अटी/शर्ती -** १) सविस्तर सुचना व माहिती ग्रामपंचायत मौजे कोल्हार बु।।, ता. राहाता येथे कार्यालयात पहावयास मिळतील. २) सदर कामाचे कोणतेही दरपत्रक अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार व उशिरा आलेली कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

sd/- **ग्रामविकास अधिकारी**
sd/- **सरपंच**
ग्रामपंचायत कोल्हार बु।।, ता. राहाता, जि. अहमदनगर

पान १ वरुन

## सामाजिक न्यायचा निधी लाडक्या बहिणींसाठी

खात्यात निधी जमा होण्यास सुरुवात होईल, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, शासकीय सेवेत असुनही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्याऱ्या महिलांना योजनेसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे.

## कुणाल कामरा, सुषमा अंधारे यांच्यावर विधिमंडळात हक्कभंग मंजूर

यांच्याविरोधात विधानपरिषदेचे सदस्य आमदार प्रविण दरेकर यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. आता सुषमा अंधारे आणि कुणाल कामरा यांच्या विरोधातील हक्कभंग स्वीकारण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंविरोधात हक्कभंग मंजूर झाला आहे. त्यानुसार, आता कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंना सोमवारी नोटीस काढली जाणार असल्याने कॉमेडियन कामरा आणि शिवसेना नेत्या अंधारेंच्या अडचणी वाढल्या आहेत.

### वयोवृद्ध महिलांना सोन्याची बिस्किटे देतो म्हणून

## फसवणूक करणारी टोळी कर्जत पोलिसांनी केली जेरबंद

**श्रीगोंदा :** श्रीगोंद्यासह कर्जत तालुक्यात वयोवृद्ध महिलांना सोन्याची बिस्किटे देतो असे सांगून सोन्याचे बिस्कीटाचे अमिष दाखवुन पितळी बिस्कीट देवुन वयोवृद्ध महीलांची फसवणुक करणा-या टोळीस कर्जत पोलीसांनी केले जेरबंद केले असून त्याच्याकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल कर्जत पोलिसांनी हस्तगत गेला आहे या आकारवाईआचे सर्वच स्तरातून कौतुक होताना दिसत आहे. कर्जत पोलीस ठाण्यात फिर्यादी बेबी शशिकांत महाडिक, वय ६५ वर्षे धंदा शेती रा. पाटेवाडी, ता. कर्जत यांनी दाखल केलेल्या गुन्ह्याचा फिर्यादीत कर्जत येथील स्टेटे बँकेचे पाठीमागे तीन ते चार अनोळखी इसमांनी संगणमत करुन तुझे गळ्यातील सोन्याचे मनी असलेले सोन्याची पोत व पैसे आम्हाला दे आम्ही तुला सोन्याचे बिस्कीट देतो असे म्हणुन माझे समोर त्यातील एका इसमाने सोन्यासारखे दिसणारे पितळी बिस्कीट देवुन विश्वास संपादन करुन त्यांच्या गळ्यातील ४ ग्रॅम वजनाचे सोन्याची पोत, व पैसे देण्यास सांगितल्याने त्यांनी गळ्यातील सोन्याची पोत व पैसे वरील इसमास दिल्यांनंतर पिवळ्या धातूचे सोन्यासारखे दिसणारे पितळी बिस्किट देवुन फसवणुकी केली .याचा तपास कर्जत पोलीस करत होते त्यातच श्रीगोंदा बस स्थानक परिसरात कर्जत येथील महिलेला सिन्याची बिस्किटे देती असे सांगून तिच्या गळ्यातली दागिणे चोरून नेल्याची घटना घडल्यावर श्रीगोंदा पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्यावर दैनिक राष्ट्र सह्याद्री वृत्त पत्रातून बातमी प्रसाराची झाल्यावर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसर श्रीगोंद्यात गुन्हा दखल झाला मात्र याबाबत वर्तमान पत्रातुन बातमी प्रसारित झाल्यावर त्याच चोरांनी श्रीगोंद्यातही फसवणूक केली असल्याची माहिती कर्जत पोलिसांना मिळाली त्यानुसार पोलिसांनी तपास केल्यावर त्याच चोरटयांनी कर्जत मधील ३ तर श्रीगोंद्यातील एक अश्या एकूण ४ गुन्ह्याची उकल झाली असून त्यानुसार आरोपीनामे अभिमान बाबु तुपे वय ४८ वर्षे रा पिठी निरगुडी ता पाटोदा जि बीड,विकी अभिमान तुपे वय २७ वर्षे रा पिठी निरगुडी तां पाटोदा जि बीड ,विकास विजय जाधव वय २८ वर्षे रा धस पिंपळगाव ता पाटोदा जि बीड,दत्ता अर्जुन जोरे वय २९ वर्षे रा हिवरसिंगा ता शिरुर कासार जि बीड यांना मोठ्या शिताफीने पकडुन ताब्यात घेतले. आरोपी यांना कर्जत पोलिस स्टेशन येथे घेवुन आल्यानंतर सदर आरोपींना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता चार गुन्हयाची कबुली दिली.असून त्याचेकडून ५ ग्रॅम सोन्याचे दागिने व २५ हजार रुपये रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेली ६लाख रुपयाची मारुती सुझुकीची स्वीफट कंपनीची गाडी किं. अं असा एकुण ७लाख ६० हजार ५५९ रुपये किंमतीचा मुददेमाल व आरोपी यांनी गुन्हयात वापरलेली मारुती सुझुकीची स्वीफट गाडी हस्तागत करण्यात आली आहे. सदरची कारवाई-मा. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे , अपर पोलिस अधिक्षक प्रशांत खैरे , उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश उगले , पोलिस निरीक्षक सोपान शिरसाठ, सपोनि रमिझ मुलाणी पोहेकॉ प्रविण अंधारे, पोहेकॉ मनेष शिंदे, पोकॉ प्रताप देवकाते, पोकॉ किरण बोराडे, पोकॉ प्रकाश दंदाडे, पोकॉ किरण जाधव, पोकों नितिन धस, पोकॉ लहु घोलवाड, जामखेड पोलिस स्टेशनचे पोकॉ प्रकाश मांडगे, पोकॉ कुलदीप घोळवे व मोबाईल सेलचे पोकों राहुल गुंडू पोकॉ नितिन शिंदे व मपोकॉ ज्योती काळे यांनी केली आहे.

### आदिनाथ ठोंबरे यांच्या पाठपुराव्याला यश

## सुजय विखे यांच्या हस्ते शाळा खोल्यांचे लोकार्पण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील पाचुंदा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी युवा नेते आदिनाथ ठोंबरे यांच्या आग्रहाखातर शाळेच्या दोन वर्ग खोल्या मंजूर केल्या होत्या. त्या खोल्याचे काम पूर्ण झाल्याने सुजय विखे पाटील यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम माजी खासदार सुजय विखे पाटील यांची गावातून ढोल ताशांचा गजरात फटाक्यांच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर शाळेच्या नूतन खोल्यांची रिबीन कापून लोकार्पण सोहळा पार पडला. यानंतर हनुमान मंदिर सभामंडपात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊराव कारभारी ठोंबरे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते आदिनाथ ठोंबरे यांनी केले. आलेल्या प्रमुख मान्यवरांचा सन्मान यावेळी करण्यात आला.यावेळी सुजय विखे पाटील बोलतांना म्हणाले की, कार्यकर्ता आदिनाथसारखा हाडाचा असावा, ज्यांनी पाठपुरावा करून या खोल्यांची कामे मंजूर करून घेतली. मी या मतदारसंघाचा खासदार नसूनही हे काम फक्त कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर करावं लागलं. भविष्यात तुमच्या गावातील कोणतेही काम सांगा मी करेल, असे आश्वासनही विखे पाटील यांनी दिले. या कार्यक्रमाप्रसंगी गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, विस्तार अधिकारी केदार मॅडम, बालाजी देडगावचे पोपटराव बनसोडे, युवा नेते उमेश हंडाळ, दादा भिसे, खंडेश्वर वाघमोडे, शंकर कोकरे, मनाजी कोकरे मुकादम, बबनभाई सय्यद, अविनाश वाघमोडे, शहाजी पठारे, नाथा माने, आजिनाथ भाऊसाहेब होंडे, नवनाथ होंडे, शंकर वाघमोडे, शहादेव होंडे, संभाजी होंडे, संदीप जमादार, अशोक ठोंबरे, गणेश शिंगटे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मरकड सर व सर्व शिक्षक वृंद व पाचुंदा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपूर-केअर फोर सोसायटी हेल्थद्वारे स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण




**श्रीरामपूर :** केअर फॉर सोसायटी हेल्थ द्वारे स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण केअर फॉर सोसायटी हेल्थ, श्रीरामपूर यांच्या वतीने प्रतिक्षाताई कोरगांवकर अहिल्यानगर यांनी नुकतेच महिला व युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. आपल्या मनोगतातून त्यांनी आजच्या काळात महिलांनी स्वसंरक्षण केले पाहिजे, आत्मविश्वास् वाढविला पाहिजे त्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

केअर फॉर सोसायटी हेल्थ ही एक सामाजिक सेवाभावी कार्य करणारी महिलांची समिती आहे. या मार्फत मोफत सुवर्णप्राषाण उपक्रम हॉस्पीटलसाठी बेड दान अंध व्यक्तीसाठी दिवाळी भेट, वहया पुस्तके वाटप, शाळा महाविद्यालयातील विद्यार्थीसिणि मोफत योगा, ध्यानधारणा, फिटनेससाठी व्यायाम प्रशिक्षण, गरजूंना आर्थिक मदत, अनाथ आश्रम येथे मुलांना धान्य, खाऊ, किराणा, शालेय साहित्य उतर उपयोगी वस्तू देणगी असे उपक्रम घेतले जातात. अशी माहिती समितीच्या अध्यक्ष प्रिया शहा यांनी दिली. समितीमार्फत शैक्षाणिक उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व समितीस सहकार्य करणाऱ्या शाळाप्रमुखांचा सत्कार यावेळी करण्यात आला उपाध्यक्ष निशा सरोदे यांनी सर्वांचे स्वागत केले तर आभार अध्यक्ष प्रिया शहा यांनी मांडले सूत्रसंचालन जयश्री बिंगले यांनी केले.

## निधन वार्ता..

### ज्ञानदेव डोळे



**सोनई :** नेवासा तालुक्यातील वंजारवाडी येथील पोलीस पाटील रमेश डोळे यांचे वडील ज्ञानदेव जनाजी डोळे (वय ७५) यांचे नुकतेच निधन झाले. नेवासा तालुक्यात त्यांनी सन १९७२ मध्ये प्रथम बीएससी अँग्री पदवी धारण केलेली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. पोलीस पाटील रमेश डोळे यांचे ते वडील होत.

## पायरेन्सच्या आठ विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड

**लोणी :** पायरेन्स आयबीएमएच्या एमबीए विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने व आत्मविश्वासाने करिअरच्या जगात भक्कम पाऊल ठेवले आहे. विविध नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वीरित्या निवड होऊन संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांना व्यवसायिक जगात प्रवेश मिळवून देण्यासाठी पायरेन्स एमबीए विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. आर्थिक, बांधकाम, बँकिंग आणि विक्री क्षेत्रातील नामांकित कंपन्यांमध्ये निवड होणे ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता व कौशल्याची पावती आहे विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि चिकाटीच्या जोरावर पायरेन्स आयबीएमएने ग्रामीण विद्यार्थ्याना नोकरी आणि रोजगार उपलब्धीमध्ये अव्वल स्थानावर असल्याची माहिती संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी दिली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये निकिता अरणे आर. ए. वरखडे अँड कंपनी( लेखापाल), प्राजक्ता कदम मावळा प्रॉपर्टीज( विक्री कार्यकारी) राजेश खामकर एसएमएफजी इंडिया क्रेडिट( क्रेडिट ऑफिसर) , प्रणाली लिहीणार स्पाइफ इंजिनिअरिंग (साईट सुपरवायझर) वैभव लोखंडे मळगंगा कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर( साइट पर्यवेक्षक) , तुषार राजभोय एचडीएफसी बँक (पोर्ट पोलिओ ऑफिसर), ऋतुजा सातपुते डीसीबी बँक( रिलेशनशिप मॅनेजर), ऋषिकेश शिंदे रुरल शोअर (प्रोसेस असोसिएट) यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे विखे पाटील , डॉ. निलेश बनकर सचिव पायरेन्स, आणि आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी अभिनंदन केले आहे.

**संस्थेच्या माध्यमातून आम्हा विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध कौशल्य प्रदान करण्यात आले या ठिकाणी असलेल्या विविध सेवा सुविधांमुळेच आम्हाला हे यश मिळवता आले असे प्रणाली लिहिणार यांनी सांगितले.**

## स्कोडा ऑटो इंडियाने आतापर्यंतचा सर्वोच्च सहामाही विक्रीचा टप्पा गाठला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**नाशिक :** स्कोडा ऑटो इंडिया प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, जेथे भारतात २५ वा वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वे वर्ष साजरा करत आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटोने भारतातील आपल्या २५ वर्षांच्या इतिहासामध्ये सर्वोच्च सहामाही विक्री संपादित केली आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, ''आमच्या महत्त्वपूर्ण सहामाही विक्रीमधून भारतातील ग्राहकांनी स्कोडा उत्पादने व सर्विसेसचा केलेला अवलंब दिसून येतो. आमच्या ग्राहकांना दररोज विश्वातील सर्वोत्तम स्थळांना एक्स्प्लोअर करायला आवडते. आमच्या पोर्टफोलिओमध्ये कायलॅकची भर करण्यासह आम्ही आता 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'च्या माध्यमातून, तसेच आमच्या सेदान ऑफरिंगच्या माध्यमातून त्यांचा प्रवास अधिक सुखकर व उत्साहवर्धक करत आहोत.

**विक्री विक्रम स्थापित करत आहे :** २०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटो इंडिया आता भारतातील टॉप सात ऑटोमोटिव्ह ब्रँड्समध्ये सामील झाली आहे. २०२४ मधील रँकिंग्जच्या तुलनेत कंपनीने चार पोझिशन्स वर झेप घेतली आहे. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने २०२२ मधील २८,८९९ युनिट्सच्या सर्वोत्तम सहामाही विक्रीला मागे टाकले आहे.

**ग्राहकांसाठी अधिक सोयीसुविधा :** २०२१ मध्ये १२० टचपॉइण्ट्स वरून स्कोडा ऑटो इंडियाने आपले नेटवर्क आजच्या तारखेपर्यंत २९५ हून अधिक टचपॉइण्ट्सपर्यंत विस्तारित केले आहे. कंपनी २०२५ च्या अखेरपर्यंत ३५० टचपॉइण्ट्सचा टप्पा गाठण्याच्या आपल्या ध्येयाप्रती कटिबद्ध आहे, ज्यासाठी भारतभरात विनासायास ग्राहक अनुभव देण्याप्रती कटिबद्धता अधिक दृढ करत आहे.

# विमा एजंट : समाज हिताची जाण असलेला उद्योजक

भारत देश सध्या अशा एका वेगळ्या वळणावर उभा आहे. जिथे आर्थिक सुरक्षा व उद्योजकता एकमेकांना पूरक ठरत आहेत. जगातील सर्वात तरुण आणि सर्वात गतिशील मनुष्यबळ आपल्याकडे आहे आणि प्रत्येकजण अशा करिअरच्या शोधात आहे जिथे आर्थिक स्वातंत्र्य मिळते. व्यावसायिक विकास आणि हेतू साध्य होतो. अशी एक शक्तिशाली आणि मोठ्या लाभाची करिअर संधी म्हणजे विमा एजंट बनणे होय. पारंपारिक उद्योजक उपक्रम, ज्यामध्ये बऱ्यापैकी भांडवल गुंतवले जाते, असे न करता हे काम असा व्यवसाय उभारणीत मदत करते ज्यामध्ये लोकांच्या आयुष्यात खरा फरक निर्माण होतो. २०२५ मध्ये भारताचा जीडीपी अलीकडेच ४ ट्रिलियन मार्क पेक्षा जास्त असल्याची नोंद झाली आहे. देशाचा विकास झपाट्याने होत आहे आणि भविष्यकाळात जपान व जर्मनीला मागे सारून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीने पाऊल टाकत आहे (स्त्रोत: ऍीरीळर ढळाशी). अशा आर्थिक प्रगतीमुळे नैसर्गिकरित्या प्रति व्यक्ती उत्पन्नात वाढ होते, ज्यामुळे वेळेनुसार अधिक संपत्ती आणि मालमत्ता जमा करण्यास व्यक्तींना सक्षम बनवते.

या संदर्भात, या मालमत्तांचे संरक्षण करण्याची भूमिका केवळ व्यक्तींचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठीच नाही तर राष्ट्र-निर्माणात योगदान देण्यासाठीही सर्वोत्तम बनते. विमा एजंट केवळ पॉलिसी विकत नाही तर ते कुटुंबांना आर्थिक संरक्षण, व्यवसायात स्थिरता आणि कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस मनःशांती मिळेल यासाठी देखील प्रयत्न करतात. भारतासारख्या देशात जिथे विमासंबंधी मोठया प्रमाणात जागरूकता नाही, जिथे लाखो लोकांच्या आयुष्यात आर्थिक धक्के सुरूच असतात, त्याठिकाणी हा व्यवसाय करणे म्हणजे केवळ करिअर घडवणे नाही तर एक प्रकारचे मिशन साध्य करणे होय.

विमा एजंटची भूमिका आजच्या घडीला उपलब्ध असलेल्या सर्वात आकर्षक आणि परिपूर्ण करिअर मार्गांपैकी एक आहे. संरचित आणि सुस्थापित उद्योगाचा लाभ घेताना एजंट उद्योजकतेच्या लवचिकता आणि स्वातंत्र्यासह कार्य करतात. मोठ्या भांडवली गुंतवणूकीची आवश्यकता नाही आणि तरीही आर्थिक ध्येय बऱ्याप्रमाणात गाठले जाते. पॉलिसी विकून कमवलेले कमिशन केवळ एक वेळचे उत्पन्न नाही तर पॉलिसी नूतनीकरणाद्वारे दीर्घकालीन महसूल निर्मिती होऊ शकते. अनेक इंडस्ट्रीजमध्ये कमाई व्यवहारिक असते मात्र बहुतांश सर्वसाधारण विमा पॉलिसी वार्षिक आहेत, म्हणजे त्यांचे दरवर्षी नूतनीकरण करणे गरजेचे आहे. विमा एजंटसाठी, हे आवर्ती उत्पनाचा मार्ग तयार करते, जिथे आज विकलेली प्रत्येक पॉलिसी वर्षानुवर्षे महसूल निर्माण करत राहते. ग्राहक मिळवण्यासाठी केलेली धडपड एकदा केलेल्या विक्रीसह व्यर्थ जात नाही; त्याऐवजी, ती एक चक्रवाढ आर्थिक प्रवाह तयार करते, ज्यात शाश्वत कमाई आणि आर्थिक सुरक्षा सुनिश्चित होते.

विमा क्षेत्रात देखील डिजिटल युगाचा आरंभ झाल्यामुळे आजच्या घडीला विमा एजंट बनणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाले आहे. भारतीय विमा कंपन्यांनी तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे ग्राहकांपर्यंत डिजिटलपणे पोहोचणे, त्वरित पॉलिसी जारी करणे आणि वास्तविक वेळेत त्यांना सहाय्य करणे या गोष्टी आता सहज शक्य झाल्या आहेत. मोबाईल प, एआय-संचालित ग्राहक सेवा, डिजिटल पॉलिसी जारी करणे आणि विमा ट्रॅकिंग यामुळे एजंटच्या कामात अमुलाग्र बदल दिसून येत आहे. या उपयुक्त साधनांसह, एजंट आता एकाच वेळी एकाधिक ग्राहकांची मागणी पूर्ण करू शकतात, कागदरहित व्यवहार करू शकतात आणि प्रवासात असताना देखील वैयक्तिकृत उपाय सूचवू शकतात. या डिजिटल परिवर्तनामुळे कार्यात्मक अडथळे दूर झाले आहेत, ज्यामुळे एजंटला महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करता येते जसे की ग्राहकांशी चांगले संबंध निर्माण करणे आणि योग्य आर्थिक उपाय सुचविणे. तरीही, अशा प्रकारची तांत्रिक प्रगती होत असताना देखील विमा हा असा व्यवसाय आहे, जो आपापसातील संभाषण व विश्वास या घटकांवर अवलंबून आहे. अनेक वित्तीय उत्पादने ऑनलाईन घेतली जाऊ शकतात मात्र विमा प्रकारात अनेकदा मार्गदर्शनाची आवश्यकता असते. ग्राहक पॉलिसी खरेदी करण्यापूर्वी त्याबाबतची स्पष्टता, संरक्षणाचे लाभ, अपवाद या सर्व बाबी तपासून घेत असतो. आणि याचवेळी विमा एजंट मुख्य भूमिका बजावतो. वितरण हा विमा उद्योगाचा मेरुदंड आहे, ज्यामुळे लोकांना त्यांची आर्थिक जोखीम पूर्णपणे समजल्याची आणि पुरेसे संरक्षित असल्याची खात्री होते. एजंट जटिल पॉलिसी आणि वास्तविक जीवनाची आर्थिक सुरक्षा यादरम्यानचे अंतर कमी करतो, ज्यामुळे खरेदी प्रक्रिया अधिक सरळ, सहज वापरण्याजोगी आणि ग्राहकांना दिलासा देणारी ठरते.

वाढती अर्थव्यवस्था असूनही, भारतात विमासंबंधी जागरूकता कमीच आहे आणि जागतिक सरासरीपेक्षा विम्याचा प्रसार लक्षणीयरीत्या कमी आहे. जीवन विम्याचे प्रमाण जीडीपीच्या अंदाजे २.८% आहे, तर सर्वसाधारण विमा देखील कमी आहे म्हणजे जवळपास १%. भारतात ज्याप्रमाणात नैसर्गिक आपत्तीच्या घटना घडत आहेत त्यामुळे साहजिकच चिंतेचे वातावरण आहे. सन १९०० पासून, १९०० ते २००० दरम्यान ४०२ आपत्ती घटना आणि २००१ ते २०२२ दरम्यान ३६१ आपत्ती घटना घडल्या आहेत. या घटना अधिक वारंवार होत आहेत आणि त्यामुळे गंभीर आर्थिक ताण निर्माण होत आहे. विविध प्रकारच्या आपत्तींमध्ये, पूर परिस्थिती सर्वात सामान्य आहेत, ज्यामध्ये जवळपास ४१% सर्व घटनांचा समावेश होतो, त्यानंतर क्रम लागतो वादळाचा (स्त्रोत: SBI research). याव्यतिरिक्त, अहवाल दर्शवितात की देशाचा ५९% भाग भूकंपासाठी असुरक्षित आहे. सध्याचेच उदाहरण घ्यायचे म्हटले तर दिल्लीतील ४ रिश्टर स्केलचा भूकंप (स्त्रोत: PIB). हे अहवाल सामान्य जनता, पायाभूत सुविधा आणि संसाधनांसाठी गंभीर जोखीम अधोरेखित करतात.

हे संरक्षण अंतर केवळ समाजातील सर्वात असुरक्षित घटकापर्यंत आणि देशाच्या दुर्गम भागांपर्यंत आपली पोहोच वाढवून संबोधित केले जाऊ शकते. आपली लोकसंख्या सर्वसमावेशक विमा अंतर्गत संरक्षित असल्याची खात्री करून, आपण आपत्तींनंतर या समुदायांना महत्त्वाचे आर्थिक सहाय्य प्रदान करू शकतो, त्यांना त्यांचे आयुष्य पुन्हा उभे करण्यास आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करू शकतो. विमा या प्रकाराचा अवलंब करण्यासाठी, सरकारने आयुष्मान भारत, पीक विमा योजना आणि अपघात संरक्षित कार्यक्रम यासारख्या उपक्रमांची सुरुवात केली आहे. तरीही, विमा एजंट हा जनता आणि या आर्थिक सुरक्षा तरतुदी या दरम्यानचा खरा दुवा आहे. जोखीम संरक्षणाचे महत्त्व यावर व्यक्ती आणि व्यवसायांना शिक्षित करून आणि त्यांना योग्य पॉलिसी सुरक्षित करण्यास मदत करून देशाच्या आर्थिक लवचिकता मजबूत करण्यात एजंट महत्त्वाची भूमिका बजावतात. या व्यवसायाचे सौंदर्य ते जोपासत असलेल्या नातेसंबंधांमध्ये आहे. विमा खूपच वैयक्तिक बाब आहे, त्यासाठी व्यक्तीच्या विशिष्ट गरजा समजून घेणे, त्यांच्या पर्यायांवर शिक्षित करणे आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करणारे उपाय प्रदान करणे आवश्यक आहे. कालांतराने, एजंटचे काम विक्री पॉलिसीच्या पलीकडे विस्तारित होते; ते गरजेच्या वेळी विश्वसनीय सल्लागार, आर्थिक समस्या सोडवणारे आणि विश्वसनीय मार्गदर्शक बनतात. ग्राहकासोबत निर्मित विश्वासामुळे मजबूत व्यावसायिक संबंध, व्यवसायाची पुनरावृत्ती आणि दीर्घकालीन यश मिळते. विकली जाणारी प्रत्येक पॉलिसी केवळ व्यवहार नाही; हे व्यक्ती आणि कुटुंबांसाठी उज्ज्वल भविष्य सुनिश्चित करण्यासाठी आर्थिक सुरक्षा आणि वचनबद्धता दर्शविते.

आपले करिअर फायदेशीर व अर्थपूर्ण असावे अशी सर्वांची इच्छा असते, विमा एजंट बनल्यास या दोन्ही बाबी पूर्ण होतात. हे एक असे करिअर आहे ज्यामध्ये रोज नवनवीन लोकांशी संपर्क साधता येतो, त्यांना माहितीपूर्ण फायनान्शियल निर्णय घेण्यास आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करता येते. भारताच्या विस्तृत, अद्याप प्रकाशात न आलेल्या या क्षेत्रातील विकासाच्या संधी अतुलनीय आहेत. संकटाच्या क्षणांमध्ये विम्याचे महत्त्व सर्वाधिक कळून येते. जे लोक प्रभावित होतात, त्यांच्यासाठी जीवनवाहिनीचे कामच जणू विमा करत असते. नैसर्गिक आपत्ती, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा अपघातांमुळे विनाशकारी नुकसान होऊ शकते, परंतु विमा लोकांना त्यांचे आयुष्य पुन्हा निर्माण करण्यास मदत करण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य प्रदान करते. सरकारला या गोष्टीची जाण आहे आणि आपत्ती दरम्यान जलद दावा सेटलमेंटला सक्रियपणे प्रोत्साहन देते, विमाधारकांना वेळेवर सहाय्य प्राप्त होण्याची खात्री करते. ही उदाहरणे केवळ समाजात विम्याची महत्त्वाची भूमिका मजबूत करतात. हे घर, वाहने आणि व्यवसाय सारख्या आवश्यक मालमत्तेचे संरक्षण करते, आर्थिक तणावापासून पुनर्प्राप्ती सुलभ करते आणि मनःशांती प्रदान करते. विमा एजंट बनणे म्हणजे एक असा एक व्यवसाय निवडणे आहे, जो शाश्वत बदलाच्या निर्मितीच्या क्षमतेसह आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करतो. या उद्योगाचा विस्तार सध्या झपाट्याने होत आहे, आज जे यामध्ये सहभागी होणार आहेत, त्यांना स्वतःच्या आर्थिक लाभासह इतरांना त्यांच्या आर्थिक विवंचनेत केलेल्या मदतीचे समाधान देखील प्राप्त होईल.

सामाजिक प्रभावासह व्यावसायिक यश प्राप्त करणाऱ्या करिअरच्या शोधात असलेल्या कोणासाठी ही योग्य संधी आहे. हीच ती वेळ, अशा व्यवसायामध्ये उतरण्याची जिथे महत्त्वाकांक्षेला चालना दिली जाते, आर्थिक सुरक्षा निर्माण केली जाते आणि अर्थपूर्ण वारसा घडवला जाऊ शकतो. तुमच्या भविष्याची जबाबदारी घ्या आणि भारताच्या आर्थिक कल्याणास सुरक्षित करण्याच्या मिशनमध्ये सहभागी व्हा. आजच विमा एजंट बना!

- **Pranav Kokane**
Corporate Communications
Bajaj Ilianz General Insurance
+91 8551923198

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name **Lata Raghunath Jadhav** To New Name As **Pushplata Annasaheb Pangavhane** **Adhar Card No 661175184332** After Name My Marriage

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि. ०५ जुलै २०२५**

### मिलनम डे

| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|
| १२६ ४५० ९०० **९-८** १७० १८९ ११६ | जोड ९२-१८-०३-६५-८७ |

### कल्याण

| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|
| १४० १५९ ५०० **५-६** १२३ २४० ६०० | जोड ५२-१६-३९-७४-६० |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|
| सुटी | जोड सुटी |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

दखल

## ग्राहक पंचायतीच्यावतीने तहसीलदार दहाडदे यांचे स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** येथे नव्याने रुजू झालेले तहसीलदार आकाश दहाडदे यांचे शेवगाव तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने स्वागत करण्यात आले. शेवगाव चे तहसीलदार प्रशांत सांगडे यांची मंत्रालयात बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी नव्याने रुजू झालेले तहसीलदार आकाश दहाडदे यांचे शेवगाव तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सर्वसामान्य ग्राहकांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यांचे निराकरण व उपाय योजना करण्याविषयी चर्चा करण्यात आली. सर्वसामान्य नागरिक व ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम करणार असल्याचे तहसीलदार दहाडदे यांनी सांगितले. यावेळी ग्राहक पंचायत चे तालुकाध्यक्ष अशोकराव शेवाळे, संदीप गवळी, ज्ञानेश्वर फसले, आप्पासाहेब औटी, रवींद्र शेळके आदी. पदाधिकारी उपस्थित होते.




## जिल्ह्यातील उद्योजकांसाठी ८ जुलैला निर्यात प्रोत्साहन कार्यशाळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि निर्यातदार यांना जागतिक बाजारपेठेतील संधी मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने एक दिवसीय निर्यात प्रोत्साहन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सोमवार, ८ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता ॲटो इंजिनिअरिंग क्लस्टर, प्लॉट नं. ४७/५, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या निर्देशानुसार जिल्हा निर्यात प्रोत्साहन समितीच्या बैठकीत या कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले आहे. महाव्यवस्थापक दीपक शिवदास यांनी इच्छुकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. या कार्यशाळेत निर्यातीसंबंधी संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक परवानग्या, कागदपत्रे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी, निर्यात धोरणे, तसेच उद्योजक व शेतकरी उत्पादक कंपन्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय याविषयी तज्ज्ञ सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. एकाच ठिकाणी सर्व महत्त्वाची माहिती मिळाल्याने सहभागी उद्योजकांना मोठा लाभ होणार आहे. कार्यशाळेबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन रोड, शासकीय तांत्रिक विद्यालय आवार, एमएसईबी कार्यालयाच्या मागे, अहिल्यानगर येथे भेट द्यावी किंवा ०२४१-२३५५३४२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विवाहितेचा पैशासाठी मानसिक आणि शारीरिक छळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर –** लग्नाला अवघे काही महिने झाले असतानाच सासरच्यांनी विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याची तक्रार समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पतीसह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती नितीन रावसाहेब पाखरे (वय ३३), सासरे रावसाहेब पाखरे, सासू भागीत्रा रावसाहेब पाखरे आणि दीर अशोक रावसाहेब पाखरे (सर्व रा. गणेशनगर रस्ता, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. फिर्यादी महिला सध्या अहिल्यानगरमधील सावेडी परिसरात राहत असून, त्यांचा विवाह ३१ डिसेंबर २०२३ रोजी नितीन पाखरे याच्याशी हिंदू विधीनुसार झाला होता. मात्र, लग्नानंतर काही दिवसांतच पती नितीन याने विनाकारण भांडणं करणे, शिवीगाळ करणे व मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यास विरोध केला असतानाही सासू, सासरे आणि दीर यांनी एकत्र येत पैशांसाठी त्रास देणे, शिवीगाळ करणे आणि धमक्या देणे सुरू ठेवले, असा आरोप तिने तक्रारीत केला आहे. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी संशयितांनी तिला विनाकारण भांडण करत घराबाहेर काढले, असेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# डॉ . प्रशांत भालेराव यांना लंडनचा गेस्ट ऑफ ऑनर पुरस्कार जाहीर

## जगभरातील २५ सर्वश्रेष्ठ उद्योजकांमध्ये झाली निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव:**श्री रेणुकामल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह अर्बन क्रेडीट संस्थेच्या माध्यमातून समाजभान जपत, सर्व व्यवहारात पारदर्शकता ठेवत ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ . प्रशांत चंद्रकांत भालेराव यांनी मोठी गरुड भरारी घेतली आहे .

त्यांच्या या कार्यकर्तृत्वाची दखल आतापर्यंत त्यांना मिळालेल्या शेकडो पुरस्कारानी घेतली आहे . मात्र या सर्व पुरस्कारावर नुकताच त्यांना ‘‘लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल डेव्हलपमेंट ‘‘ या संस्थेने जगभरातील २५ सर्वश्रेष्ठ उद्योजकांमध्ये त्यांची निवड करून कळस चढविला आहे .जुलै २५च्या दुसऱ्या आठवड्यात इंग्लंडची राजधानी लंडनच्या ’ हाऊस ऑफ पार्लमेंट ’ मध्ये अर्थतज्ञ डॉ भालेरावांना अत्यंत मानाचा असा ‘‘गेस्ट ऑफ ऑनर‘‘ देऊन गौरवण्यात येणार आहे . यावेळी डॉक्टर भालेराव नवउद्योजकासह उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत . जगप्रसिद्ध लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्कील डेव्हलपमेंट या नामांकित संस्थेने नवोदित उद्योजकांना प्रेरणा मिळावी . अर्थार्जन व संकलना बरोबरच समाज भान जपण्याची शिकवण मिळावी या उद्देशाने संपूर्ण जगभरातील अशी दूरदृष्टी असलेल्या २५ अग्रेसर उद्योजकाची निवड करून त्यांच्या जीवनपटाची माहिती एकत्रित संकलित करण्यात आली आहे . ही निवड जगभरातून उच्च व्यावसायिक गुणानुसार काम करणाऱ्या व्यावसायिकामधून करण्यात आली असून ’ या संकलित लिखाणाचे प्रकाशन गुरुवार दिनांक १० जूलै ला लंडनच्या हाऊस ऑफ पार्लमेंट मध्ये होत आहे . त्यानंतर १२ जुलैला त्याचे ऑनलाईन प्रकाशन देखील होणार आहे तर बुधवार दिनांक १६ रोजी एका विशेष सोहळ्यात निवड केलेल्या . उद्योजकांना ‘‘ गेस्ट ऑफ ऑनर ‘‘ देऊन गौरविण्यात येणार आहे . तो स्विकारून तेथील नवउद्योजकांना मार्गदर्शन करण्याचे निमंत्रण अर्थतज्ञ डॉ . भालेराव नानां यांना मिळाले आहे . तथापि दहा जुलैला गुरुपौर्णिमा असून श्री रेणुका आईसाहेब त्यांच्या गुरु असल्याने श्री क्षेत्र अमरापुरच्या श्री रेणुका देवस्थानात सालाबादपणे गुरु पौर्णिमेचा मोठा उत्सव आहे . त्यामुळे ते दिनांक १० व १२ च्या सोहळ्यास उपस्थित न राहता थेट दि १६ च्या ‘‘‘‘ गेस्ट ऑफ ऑनर‘‘ च्या सोहळ्यास हजेरी लावून तो ते सहकुटूंब उपस्थिती लावून स्विकारणार असून नवउद्योजकानां मार्गदर्शन देखील करणार आहेत . या सोहळ्यास इंग्लंडचे मान्यवर मंत्रो, नवउद्योजक , निमंत्रित उपस्थित राहणार आहेत . ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ . प्रशांत भालेराव यांनी रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून देशातील ९ राज्यात १३९ शाखा द्वारे आपल्या कार्याचा पाया रोवला . ते रेणुकामाता इंन्फो सोल्युशन्स लिमिटेड, पुणे . , ब्रिव्हरेज प्रायव्हेट लिमिटेड, अहमदनगर . , चंद्रकांत मंगल ’ व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, आणि रेणुकामाता प्रॉडक्शन हाऊस, मुंबई, या संस्थाचे संस्थापक असून अध्यक्षीय धूरा सांभाळत आहेत , रेणुकामाता सिक्युरिटीज, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मुंबई, ही संस्थाही त्यांचे मालकीची असून या संस्थाच्या माध्यमातून त्यानी अत्यंत पारदर्शी कामकाज करत सातत्याने सामाजिक कार्याचा वसा जपला आहे .म्हणूनच असोसिएट चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया, नवी दिल्ली च्या सदस्यपदीही त्यांची दोन महिन्यापूर्वी नियुक्ती झाली आहे . या सर्व बाबीची दखल घेऊन डॉ भालेराव यांची या सर्वोच्च सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे . डॉ . प्रशांत यांना मिळालेल्या या सन्मानाने येथील रेणुका परिवार आनंदला असून त्याबद्दल श्री क्षेत्र अमरापूरच्या श्री रेणुका माता देवस्थानात एका स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष तथा रेणुका परिवाराचे ज्येष्ठ सदस्य सुभाष घोडके यांनी दिली आहे.



## प्रामाणिकपणाचे फळ निश्चित मिळते : अरुण तनपुरे

### प्रकाश धनवटे यांचा सेवापूर्ती गौरवसोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** प्रामाणिकपणे कार्य केल्यास जीवनात योग्य फलित मिळते. प्रकाश धनवटे यांनी संस्थेमध्ये प्रामाणिकपणे कार्य केले. इतरांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी केले.

डॉ. तनपुरे कारखान्याशी संलग्न असणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ब्राह्मणी व भाग शाळा उंबरे शाळेचे उपशिक्षक प्रकाश धनवटे सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून तनपुरे बोलत होते. बालब्रह्मचारी मुक्तानंदगिरी महाराज, कारखान्याचे संचालक चाचा तनपुरे, आप्पासाहेब शिंदे यांच्या हस्ते धनवटे दाम्पत्याचा गौरवचिन्ह, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

चाचा तनपुरे म्हणाले की, शिक्षक समाजातील लोकशिक्षक असतो. शिक्षक भविष्यातील पिढी घडवतात. त्यांच्या प्रत्येक कृतीचे अनुकरण विद्यार्थी करतात विद्यार्थ्यांमध्ये क्षमता निर्माण करण्याचे कार्य धनवटे यांनी उत्तम प्रकारे पार पाडले आहे.

आप्पासाहेब शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कारखान्याचे संचालक भारत वारुळे, किसन जवरे, भास्कर ढोकणे, प्रमोद तारडे, वैशाली तारडे, ब्राह्मणीच्या सरपंच सुवर्णा बानकर, सौरभ उंडे, बाप्पू तनपुरे, संभाजीराजे तनपुरे, संभाजी गाडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन कैलास डोके, दुधे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक नानासाहेब जाधव यांनी केले. आभार कदम यांनी मानले.



## आ. संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर –** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांना दोन दिवसांत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमदार जगताप यांचे स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. शिरसाठ यांच्या मोबाईलवर दि. २ जुलै दुपारी तीनच्या सुमारास हिंदी भाषेतून एक धोकादायक मजकूर प्राप्त झाला. अज्ञात क्रमांकावरून आलेल्या मेसेजमध्ये ‘‘संग्राम को दो दिन के अंदर खत्म करूंगा‘‘ असे लिहून त्यांना जीवे मारण्याची थेट धमकी देण्यात आली. या प्रकारामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाल्या आहेत. धमकी मिळताच शिरसाठ यांनी



कोतवाली पोलीस ठाण्यात तात्काळ धाव घेत तक्रार दाखल केली. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार अमिना शेख या प्रकरणाचा तपास करत आहेत. धमकी पाठवणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल क्रमांक पोलीसांनी ताब्यात घेतला असून, तो कोणाचा आहे आणि त्यामागे कोणाचा हात आहे, याचा शोध घेण्यासाठी सायबर सेलच्या मदतीने तपास सुरू आहे. दरम्यान, आमदार संग्राम जगताप यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिरिक्त खबरदारी घेतली जात आहे. पोलिसांनी हा प्रकार गंभीरतेने घेत पुढील काही दिवस त्यांची सुरक्षा वाढवण्याची शक्यता आहे. राजकीय पार्श्वभूमीवर आलेली ही धमकी नेमकी कोणत्या कारणावरून देण्यात आली, याबाबतही विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात असून, या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

## वीज बिल भरा आणि बक्षिसे मिळावामध्ये श्रीगोंद्यात मिळाला मोबाईल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा ;** महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरवून १ जानेवारी ते ३१ मे २५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे. यामध्ये महावितरण चे लकी ग्राहक म्हणून श्रीगोंद्यात एकाला सॅमसंग कंपनीचा मोबाईल भेट मिळाला आहे.

वीज बिल भरा आणि बक्षिसे मिळावा ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीज ग्राहकांसाठी लागू होती ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्षात एकदाही ऑनलाईन वीज देयकाचा भरणा केलेला नाही अश्या.ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ,श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे.

## ऊस पिकामध्ये नवनवीन प्रयोग करणे ही काळाची गरज : राजेंद्र नागवडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** ब्राझीलमधील ऊस शेती, बायो प्रोडक्ट उत्पादन, हवामान व नवनवीन प्रयोगांची माहिती घेतली. ब्राझीलचे उत्पादन पद्धती, जागतिक स्पर्धा व ऊस शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोग भारतातील शेतकऱ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे, असे मत नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच महाराष्ट्र राज्य साखर संघाचे संचालक राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केले. लोणी व्यंकनाथ (ता. श्रीगोंदा) येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी व सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नागवडे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब काकडे हे होते. या कार्यक्रमात लोणी व्यंकनाथ ग्रामस्थांतर्फे गावातील सुपुत्र व भीमथडी शिक्षण संस्था, दौंड येथील माजी प्राचार्य . प्रमोद दत्तात्रय काकडे यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर नागवडे कारखान्याचे संचालक . सुभाषराव शिंदे, माजी संचालक दिलीपराव काकडे, धर्मनाथ काकडे, विलासराव काकडे, सेवा संस्थेचे चेअरमन बाळासाहेब थोरात, माजी चेअरमन लालासाहेब काकडे, मोहनराव काकडे, प्रगतशील शेतकरी शंकरराव देवखिळे, लियाकत तांबोळी, भगवानराव गोरखे, ग्रामपंचायत उपसरपंच हनुमंत मगर, राजेंद्र काकडे, भूषण साळवे, संभाजी जावळे, दत्तात्रय सोनवणे, सदाशिव ओव्हळ, पांडुरंग शेंडे, दादासाहेब मडके, भाऊसाहेब डांगे, बापूराव फटाकडे, बबनराव पवार, बाळासाहेब दळवी, संतोष गोरखे, विकास खोमणे, अकबर भाई इनामदार, पांडुरंग खेतमाळीस, संतोष गोरखे, बंडू खंडागळे, किरण काकडे, पुरुषोत्तम लगड, बाळासाहेब शेंडे सर, तरटे भाऊसाहेब, खंडागळे रावसाहेब, प्रवीण काकडे, विजय काकडे, रफिक इनामदार, गणेश काकडे, अभिजीत काकडे, स्वप्निल लाटे, भास्कर कुदांडे, संभाजी भोर, निसार शेख यांच्यासह गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब जठार यांनी केले. सूत्रसंचालन . गणेश गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक दत्तात्रय काकडे यांनी केले

## जवाहर विद्यालयात कृषी दिन व डॉक्टर दिन

### प्रगतशील शेतकरी आणि डॉक्टरांचा सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:** तालुक्यातील चिंचपूर इजदे येथील जवाहर विद्यालयात कृषी दिन व राष्ट्रीय डॉक्टर दिन संयुक्तरीत्या साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी आणि डॉक्टरांचा सत्कार करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.शाळेतील मागील वर्षी विविध परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील गौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला डॉ.मारुती दहिफळे,विस्तार अधिकारी रामनाथ कराड,सरपंच पुष्पा मिसाळ,डॉ. राहुल वेलदे,मुख्याध्यापिका धनश्री शिरसाट,निलेश फुंदे,रवींद्र खेडकर,सुनील खेडकर हे उपस्थित होते.रामनाथ कराड म्हणाले,हरितक्रांतीचे जनक स्व.मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे कार्य कृषी बरोबर उद्योग क्षेत्रात मोठे आहे.आजच्या



काळात आधुनिक शेतीबरोबरच सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन याकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे. नाईक यांनी मोठे योगदान राज्यासाठी कृषी क्षेत्रात दिले त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन हा साजरा केला जात असून त्यांच्या धोरणावर आपण सर्व शेतकरी बांधवांनी मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुख्याध्यापिका शिरसाट म्हणाल्या,यांनी शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षा,नवोदय व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या उपक्रमांची माहिती देत गुणवत्ता यादीत विद्यार्थी यावेत यासाठी प्रयत्नशील असून नाविनपूर्ण उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात.प्रगतशील शेतकरी रावसाहेब खेडकर,त्रिंबक खेडकर,बाजीराव खेडकर,गोरक्ष खेडकर, बाबुराव लोखंडे,जालिंदर खेडकर,ज्ञानदेव खेडकर, देविदास खेडकर,बाबासाहेब दहिफळे,एकनाथ खेडकर, कुंडलिक खेडकर,गणेश खेडकर,देवेंद्र खेडकर,नाना पंडागळे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेखा माळवे,सविता बडे,भैय्या गायकवाड,सुभाष डोळे,उद्धव लोखंडे,वैभव खुटाळे, धनंजय घायाळ यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक निलेश फुंदे यांनी सूत्रसंचालन रवींद्र खेडकर तर आभार सुनील खेडकर यांनी मानले.

# महायुतीचे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारे : अक्षय कर्डिले

### मिरीत ४०० लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

मिरी / राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये म्हणून छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियाना अंतर्गत शासन आपल्या दारी या अभियानाच्या माध्यमातून लागणारे सर्व दाखले, प्रमाणपत्र तसेच विविध योजनांची माहिती घरपोच देण्याचे काम केले जात असून खऱ्या अर्थाने राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचे सरकार कार्यरत असल्याचे प्रतिपादन भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केले आहे. पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे परिसरातील दहा-पंधरा गावातील सुमारे ४०० लाभार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत दाखले प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम कर्डिले यांच्या हस्ते शुक्रवारी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक होते. तर प्रमुख मान्यवर म्हणून गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, नायब तहसीलदार आप्पासाहेब शिंदे, चेअरमन पुरुषोत्तम आठरे, मिरी तिसगाव नळ योजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर, मार्केट कमिटीचे संचालक वैभव खलाटे, जिजाबापू लोंढे, भाजपा तालुका अध्यक्ष संतोष शिंदे, मंडल अधिकारी प्रीती शिंदे, मंडळ कृषी अधिकारी संकेत कराळे,वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल शेलार, डॉक्टर नंदकिशोर नरसाळे,ज्येष्ठनेते कारभारी गवळी, राजेंद्र तागड, राजु गवळी,अण्णासाहेब शिंदे, शुभम मोटे,अण्णासाहेब होंडे, सरपंच गौतम कराळे,अशोक दहातोंडे,गहिनीनाथ खाडे, देवेंद्र गीते, रामेश्वर फसले, डॉक्टर संजय कराळे,बापूसाहेब घोरपडे,नवनाथ निंबाळकर, प्रमोद गाडेकर,विजयाताई सोलाट यांच्यासह अनेक मान्यवर तसेच शालेय विद्यार्थी विविध योजनांचे लाभार्थी यावेळी उपस्थित होते.

### गोरगरिबांची अडवणूक होऊ नये

राज्य सरकारने आणलेल्या योजनांचा लाभ सर्वसामान्य गरजूंपर्यंत पोहोचावा आणि या योजनांमधून गोरगरीब विधवा अपंग तसेच शालेय विद्यार्थी लाडक्या बहिणी यांना मदत व्हावी या हेतूने शासन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान प्रत्येक गावात राबवले जाणार असून या अभियानातून निश्चित गोरगरीब तसेच शालेय विद्यार्थी यांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे.अक्षय कर्डिले

### ५१५ दाखल्यांचे वाटप

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत मिरी येथे महसूल, पंचायतराज, कृषी विभाग, वन विभाग, आरोग्य विभाग यांच्या माध्यमातून सुमारे ५१५ लाभार्थ्यांना दाखले व थेट योजनांचा लाभ देण्यात आला असून शासन आपल्या दारी अभियानाच्या माध्यमातूनच हा उपक्रम हाती घेण्यात आला असून यातून निश्चित सर्वसामान्य नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. डॉ. उद्धव नाईक तहसीलदार

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज प्रक्रिया सुरू; ३१ जुलैपर्यंत मुदत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटूंना आणि त्यांच्या घडवणाऱ्या मार्गदर्शकांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी पुरुष, महिला, दिव्यांग खेळाडू आणि क्रीडा मार्गदर्शक अशा एकूण चार विभागांतील पुरस्कारांसाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. या पुरस्कारासाठी खेळाडूंच्या बाबतीत १ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीतील कामगिरीचा विचार होणार असून, मागील पाच वर्षांतील किमान दोन वर्षे जिल्ह्याच्या मान्यताप्राप्त स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असणे आवश्यक आहे. दिव्यांग खेळाडूंसाठीही हे निकष लागू होतील. क्रीडा मार्गदर्शकांसाठी मात्र मागील दहा वर्षांतील कामगिरी विचारात घेतली जाईल. अर्ज करणाऱ्यांनी महाराष्ट्रात सलग दहा वर्षे मार्गदर्शन केलेले असावे, तसेच वयाची किमान ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी. अशा मार्गदर्शकांनी राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर पदके मिळवणारे किमान तीन खेळाडू घडविलेले असावेत. अर्ज विहित नमुन्यात संघटनेमार्फत अथवा वैयक्तिकरित्या सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना ७ जुलैपासून २१ जुलै २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे उपलब्ध होईल. सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज बंद लिफाफ्यात विहित मुदतीपूर्वी कार्यालयात जमा करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. पुरस्कार प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी थेट संपर्क साधण्याचे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले आहे.

द • ख • ल

## ज्ञानगंगा प्रवरेची उपक्रमात सिंधु छाया कॅम्पचे वारकरी होणार सहभागी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** पंढरीची वारी ही महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा जपण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सुमारे १५हजार विद्यार्थ्यांच्या सहभाग असलेली वारी पंढरीची ज्ञानगंगा प्रवरेची या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून,वारकरी वेषभूशेतील विद्यार्थी वारीतील भव्य रिंगण सोहळ्याच्या माध्यमातून प्रति पंढरपूर निर्माण करणार आहेत. या विशेष उपक्रमाचे आयोजन शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता लोणी येथील विखे पाटील सैनिकी स्कूल समोरील भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला असून तत्पुर्वी सर्वगावांमधून विद्यार्थी शिक्षक आणि पालकांचा सहगाग असलेल्या दिंड्या टाळ मृदूगांचा गजर आणि विठु नामाचा जयघोष करीत सहकारच्या भूमीत दाखल होणार असून यासर्व दिंड्याचे भव्य स्वागत करण्यासाठी सहकार नगरी सज्ज झाली आहे.

## टेंभुर्णीहून एकाच दिवशी सर्व दिंड्या मार्गस्थ झाल्याने वाहतूक जाम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा दोन दिवसांवर येऊन ठेपली असल्याने नाशिक अहिल्यानगर संभाजीनगर जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यांतील पायी पालखी सोहळे टेंभुर्णीहून आज शुक्रवार दि.४ जूलै रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्याने टेंभुर्णी ते पंढरपूर मार्गावर वाहतूक जाम होत असल्याने हा ४० कि.मी.चा मार्ग चौपदरी करण्याची मागणी भेट देणाऱ्या लोकप्रतिनिधी कडे तमाम दिंडी सोहळा चालकांनी केली आहे.

टेंभुर्णी ते पंढरपूर ४०कि.मी.अंतराचे मार्गावर दिंडी पालखी सोहळ्यातील ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर, कार, पाणी टँकर या वाहनांना सकाळी नाश्ता, दुपारच्या जेवण विश्रांतीसाठी थांबा घ्यावा लागतो. प्रत्येक कि.मी. वर वाहने आत बाहेर घेण्यास वाहतुक जाम होत आहे. त्यामुळे दिंडी सोहळ्यास भेटी देण्यासाठी येणारे आमदार खासदार अन्य लोकप्रतिनिधी यांच्या कडे हा टेंभुर्णी पंढरपूर रस्ता चौपदरी करण्याची मागणी करताना दिसुन आले.

## भावाच्या खुनाचा बदला घेण्यासाठी प्लॉटिंग व्यावसायिकाची हत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पैठण :** ६ वर्षांपुर्वी लहान भावाचा खून केल्याचा बदला घेण्यासाठी चितेगाव येथील प्लॉटिंग व्यावसायिकाचे अपहरण करून त्याला ठार केल्याची घटना ३० जून रोजी पैठण तालुक्यात मंगळवारी घडली असून याप्रकरणी पोलिसांनी ६ जणांना अटक केली आहे. शेख अकबर शेख महेमूद ऊर्फ मियाँभाई (वय ५० , रा. चितेगाव) असे मयताचे नाव आहे. चितेगाव येथील माजी सरपंच शेख वाहेद शेख याकुब यांचा लहान भाऊ शेख रऊफ यांचा सहा वर्षापूर्वी खून झाला होता. याप्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने १ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निकालात शेख अकबर यांच्यासह त्यांचे वडील, भाऊ व काका यांची निर्दोष मुक्तता केली होती. भावाचा बदला घेण्यासाठी आरोपी शाहरुख ऊर्फ फजल सरदार शेख याने ६ महिन्यांपुर्वी शेख अकबर यांच्यासोबत मैत्री केली होती. ३० जून रोजी सकाळी ११ वाजता शाहरुख ऊर्फ फजल सरदार शेख याच्या सोबत शेख अकबर हे त्यांच्या जीपने (एमएच. १२, जेझेड. ७५१२) बाहेर गेले. त्यानंतर त्यांचा त्यांच्याशी कुटुंबीयांचा संपर्क झाला नाही. मोबाइल लोकेशनने पैठण रस्त्यावरील ढोरकीन येथे असल्याचे कळाले. त्यानंतर शेख अकबर यांच्या मृतदेह पैठण येथील दादेगावजवळील पुलाखाली आढळून आला.

## रूपाली बोरुडेची वर्ग २ राजपत्रित अधिकारी पदावर निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगा तर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा या परीक्षेत राहुरी तालुक्यातील गुहा येथील रुपाली अजिंक्य बोरुडे यांना यश मिळाले आहे. त्यांची सहाय्यक अभियंता पीडब्ल्यूडी (वर्ग २ राजपात्रित अधिकारी) या पदावर निवड झाली आहे. त्यांची जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद, स्टाफ सिलेकशन कमिशन या सर्व विभागांमध्ये स्पर्धा परीक्षा लडरे कनिष्ठ अभियंता या पदावर निवड झाली होती. गेल्या वर्षभरात स्पर्धा



परीक्षेत हे त्यांचे चौथे यश आहे. रुपाली बोरुडे या बी.ई सिविल, एम.ई स्ट्रकचर असून सध्या त्या जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहे. वयाच्या चौथ्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले असतानाही आई सासू-सासऱ्यांच्या, मामा-मामींच्या पाठबळामुळे यशाला गवसणी घातली. राहुरी पंचायत समितीचे माजी सदस्य कै. गुलाबराव बोरुडे व श्रीराम दूध संघांचे संचालक दिलीपराव बोरुडे यांचा त्या सुनबाई तर इंजिनिअर अजिंक्य बोरुडे यांच्या पत्नी आहे.

# आषाढीसाठी पंढरपूरला निघालेल्या गोविंदावर काळाचा घाला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला निघालेल्या वारकरी तरुणावर काळाने वाटेतच घाला घातला. अंघोळीसाठी निरा नदीत उतरला आणि काळाने डाव साधला. ३६ तासानंतर गोविंदाचा मृतदेह हाती लागला. तो मृतदेह बघून कुटुंबीयांनी आक्रोश केला.



आजीसोबत आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला निघालेल्या वारकरी तरुणावर काळाने वाटेतच घाला घातला. अंघोळीसाठी निरा नदीत उतरला आणि काळाने डाव साधला. २० वर्षांचा जालन्याचा गोविंद फोके मंगळवारी सकाळी पाण्यात वाहून गेला. त्यातच त्याचा बुडून मृत्यू झाला. गोविंदा वाहून गेल्यानंतर आजीने हंबरडा फोडला, तर कुटुंबीयांच्या आक्रोशाने गावकरही हळहळले. मंगळवारपासून त्याचा शोध सुरू होता, अखेर ३६ तासानंतर गोविंदाचा मृतदेह हाती लागला. नदीच्या प्रवाहासोबत मृतदेह वाहून गेल्याने एनडीआरएफ कडून मृतदेह शोधण्याचे काम सुरू झाले. मृतदेह सापडत नसल्याने पंढरपूर येथील आदिवासी कोळी रेस्क्यू टीमचीही मदत घेण्यात आली. ३६ तासानंतर रेस्क्यू टीमला मृतदेह सापडला. अकलूजकडच्या दोन किलोमीटर लांब नीरा नदीत मृतदेह पाण्यात तरंगताना दिसला. मृतदेह सराटी नदीकिनारी आणून फोके कुटुंबीयांना सोपवण्यात आला.

नदीच्या किनारी (अकलूजकडच्या दिशेने) गोविंद हा आंघोळ करण्यासाठी उतरला. तेव्हा त्याच्या दहा फूट अंतरावर होमगार्ड राहुल अशोक ठोंबरे (बारामती पथक) हे आंघोळ करीत होते. गोविंदला पोहता येत नव्हते. आंघोळ करताना त्याचा पाय घसरून समोरील भोवऱ्यात तो सापडला.

पाण्यात गटांगळ्या खाणाऱ्या गोविंदला पाहून शेजारील होमगार्ड राहुल ठोंबरे यांनीही लगेच पाण्यात उडी मारली. गोविंदच्या हाताला धरून ठोंबरे यांनी बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. नदीचा प्रवाह तीव्र असल्यामुळे ठोंबरे यांच्या हाताला गोविंद लागला नाही. काही क्षणात गोविंद पाण्यात गायब झाला. त्यामुळे ठोंबरे हेही पाण्यातून बाहेर आले.

# पुण्यात बांगलादेशी महिलांची घुसखोरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शहराच्या बुधवार पेठेतील गजबजलेल्या 'रेड लाईट' परिसरातून पुणे पोलिसांनी एका विशेष मोहिमेअंतर्गत आठ बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले आहे. पुणे पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरात अनधिकृतपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांच्या मुद्द्याकडे पुन्हा एकदा गंभीर लक्ष वेधले गेले आहे. गेल्या काही काळापासून महाराष्ट्रात बांगलादेशी घुसखोरांविरोधात विविध पातळ्यांवर कारवाई सुरू आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून, फरासखाना पोलिसांना बुधवार पेठेत काही बांगलादेशी महिला अनधिकृतपणे राहत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. माहितीच्या आधारे फरासखाना ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखालील तपास पथक आणि अँटी-टेररिस्ट सेलने संयुक्तपणे ही कारवाई केली. बुधवारी रात्री या पथकाने अचानक छापा टाकून संबंधित आठ महिलांना ताब्यात घेतले. या महिला भारतात बेकायदेशीररित्या राहत होत्या आणि येथे वेश्याव्यवसायात सहभागी असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. पकडलेल्या सर्व महिलांनी प्राथमिक चौकशीत आपण बांगलादेशातून बेकायदेशीरपणे भारतीय सीमेत प्रवेश केल्याचे कबूल केले. विशेष म्हणजे, पुण्यात आल्यानंतर त्यांनी स्वतःला पश्चिम बंगालचे रहिवासी भासवून, 'रेड लाईट' परिसरात वेश्याव्यवसाय करत होते.या सर्व महिलांवर विदेशी नागरिक कायदा आणि इतर संबंधित कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या पोलीस त्यांची कसून चौकशी करत आहेत. शहरात घुसखोरांवर अधिक कठोर कारवाई करण्याची गरज या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## शेतकरी प्रश्नांवर उद्धव ठाकरे यांच्याशी ॲड. अजित काळे यांची चर्चा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** महाराष्ट्र राज्याचे शेतकरी संघटना व शरद जोशी विचार मंच प्रदेश उपाध्यक्ष एडवोकेट अजितराव काळे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे नेते माननीय उद्धवराव ठाकरे साहेब यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्न संदर्भात व विशेषतः कृषी कायद्यासंदर्भात आपल्या शिष्टमंडळासमवेत सविस्तर चर्चा केली . अँड. काळे यांनी सांगितले की, कृषी हा राज्याचा विषय आहे त्यामुळे राज्यात शेती कायदे वेगळ्या असावेत तसेच कालबाह्य झालेले जुने कायदे रद्द व्हावेत आणि नवीन क्रांतिकारक शेतकरी संरक्षण कायदा आला पाहिजे ज्यामुळे शेतकऱ्यांचे अनेक संकटापासून संरक्षण होईल. आज आणि गुन्हे शाखा न्याय देण्यासाठी आहेत तशाच प्रकारची त्याच धर्तीवर कृषी गुन्हे शाखा स्थापन करून कृषी न्यायालय स्वतंत्र अस्तित्वात यावे. शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत ही अत्यंत दुर्भाग्याची गोष्ट आहे कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा शेतकऱ्यांना संरक्षण देण्यास असमर्थ असून तेथे शेतकऱ्याची मोठी लूट होते किमान आधारभूत किंमत कायद्याच्या चौकटीत बांधणे व शेतकऱ्याला संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे असे अभ्यासपूर्ण मुद्दे अॅड. काळे यांनी विचार मंथन डरे मांडले.

# दुर्गसंवर्धन संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** सामाजिक व दुर्ग संवर्धन कार्यात अग्रेसर असलेल्या मरहट्टे सह्याद्रीचे दुर्ग संवर्धन संस्थेच्या माध्यमातून २०१६ वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचे सामाजिक कार्य सुरू असून यावर्षीही जुन्नर तालुक्यातील आदिवासी गरीब गरजू १७० मुलांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले आहे. मरहट्टे सह्याद्रीचे दुर्ग संवर्धन या संस्थेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून गड किल्ले संवर्धनाचे काम सुरू असून त्याबरोबर गड किल्ल्याच्या आजूबाजूला असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, रक्तदान शिबिर, गड तेथे शिवजयंती असे उपक्रम राबवले जात आहेत. सन २०१६



पासुन ते गरजू गरीब विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे दप्तर, वह्या, पाटी, पेन्सिल, पट्टी वर्षभर पुरतील असे साहित्य देत असतात. यावर्षीही जुन्नर तालुक्यातील कोंडाजी बाबा डेरे वारकरी आश्रम शाळा, कोंडाजी बाबा डेरे वारकरी शिक्षण संस्था वैष्णव धाम, वारकरी शिक्षण संस्था ज्ञानमंदिर निमदरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुकडेश्वर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोटमवाडी चावंड या पाच शाळांमधील १७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना मिळालेले साहित्य व त्यांच्या चेहऱ्यावर आलेला आनंद यातून अजून काम करण्याची ऊर्जा मिळते. भविष्यात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचे काम सुरूच राहील, त्याचबरोबर विविध सामाजिक उपक्रम देखील संस्थेच्या माध्यमातून राबवले जातील असे मरहट्टे सह्याद्रीचे या दुर्ग संवर्धन संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# माऊलींच्या पालखी सोहळ्यात चोपदाराने वारकरी महिलेला जोरात ढकलून दिले

## चोपदारावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वेळापुर :** राज्यात सर्वत्र पंढरीच्या वारीचा उत्साह शिगेला पोहोचला असून लाखो भाविक टाळ-मृदंगाच्या निनादात, ''ज्ञानोबा-तुकाराम'' च्या जयघोषात पंढरीच्या दिशेने निघाले आहेत. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता ही पावले केवळ विठ्ठलभक्तीच्या ओढीने चालत आहेत. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत गजानन महाराज व संत मुक्ताबाई यांच्या पालख्या मार्गक्रमण करत असताना ठिकठिकाणी रिंगण, दिंडी सोहळ्यांमधून भक्तीभाव ओसंडून वाहतोय.मात्र, या भक्तिरसात आता एका धक्कादायक घटनेने खळबळ माजवली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील एका रिंगण सोहळ्यादरम्यान घडलेली घटना सध्या सोशल मिडियावर चांगलीच गाजत असून, यामध्ये एका चोपदाराने एका महिला वारकऱ्याशी उद्धट वर्तन केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ३ जुलै रोजी सकाळी वेळापूरहून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी प्रस्थान करून उघडेवाडीत पोहोचली. येथे माऊलींचे ऊभे रिंगण पार पडले. रिंगणानंतर महिला वारकरी डोक्यावर तुळस घेऊन प्रदक्षिणा घालत असताना आळंदी देवस्थानचे चोपदार बाळासाहेब चोपदार हे अचानक पुढे आले व त्यांनी एका महिला वारकऱ्यास भर गर्दीत ढकलून दिले. या धक्क्यामुळे सदर महिला इतर वारकऱ्यांच्या अंगावर पडली. विशेष म्हणजे तिच्या डोक्यावर पितळेची तुळस होती. ती तुळस इतर कोणाला लागली असती, तर मोठा अपघात होऊ शकला असता. या घटनेनंतर चोपदार महाशयांनी आपली मर्यादा ओलांडत त्या महिलेशी वाद करत गोंधळ घातला. संपूर्ण प्रकार संत ज्ञानेश्वर पालखी सोहळाप्रमुख डॉ.भावार्थ देखणे आणि आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ यांच्या समोर घडला.

**सामाजिक प्रतिक्रिया:**

सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच नेटीझन्सनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या. वारी म्हणजे भक्ती, शिस्त, प्रेम व समर्पण यांची शिकवण देणारा महाउत्सव. मात्र, अशा पवित्र सोहळ्यात महिला भक्तांशी झालेलं वर्तन ही वारीच्या संस्कृतीला लागलेली काळिमा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

''**माऊली म्हणजे आई,** आणि तिच्याच पालखीमध्ये एका स्त्री भक्तेसोबत अशा प्रकारे वागणं हे अत्यंत लज्जास्पद व निंदनीय आहे,'' अशा शब्दांत अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. काहींनी या चोपदारावर कारवाईची मागणी करत देवस्थान प्रशासनाला जबाबदार धरले आहे.

**कारवाईची मागणी वाढली:** वारीतील शिस्तीचा मान राखणं ही प्रत्येक सेवकाची जबाबदारी असते. त्यामुळे संबंधित चोपदारावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी वारकरी आणि नेटीझन्सकडून केली जात आहे. अन्यथा, वारीतील सेवाभाव आणि भक्तिभाव यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल, अशी भीतीही व्यक्त होत आहे.

# खासगी गाडीवर महाराष्ट्र शासन पाटी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




पाबळ : शिरूर तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयात कार्यरत असलेले उपअधीक्षक अमोल भोसले हे खासगी वाहनावर महाराष्ट्र शासन अशी शासकीय पाटी लावून फिरत असल्याचे उघड झाल्याने एका सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार केल्यानंतर शिरूर पोलिस स्टेशनचे ट्राफिक हवालदार राजेंद्र वाघमोडे व शेखर झाडबुके यांनी तातडीने फोटो काढत चलन काढले आहे आहे. या प्रकारामुळे स्थानिक प्रशासनात आणि नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदर वाहन खासगी असूनही त्यावर शासकीय वाहन असल्याचा आभास निर्माण करणारी पाटी लावण्यात आली आहे. यामुळे कायद्यानुसार तीव्र आक्षेप घेतला जात आहे. शासन नियमावलीनुसार केवळ शासनाच्या नावे नोंदणीकृत वाहनांवरच अशा स्वरूपाची पाटी लावण्यास परवानगी आहे. मात्र खासगी वाहनावर अशी पाटी लावल्यास तो फसवणूक, दिशाभूल आणि शासकीय अधिकाराचा गैरवापर मानला जातो. या प्रकरणी जागरूक नागरिकांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे अधिकृत लेखी तक्रार सादर करणार असल्याचे सांगितले आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारकर्त्यांनी पुरावेही सादर करण्याची तयारी दर्शवली आहे. या प्रकारामुळे सरकारी अधिकाऱ्यांच्या वागणुकीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे ठरत आहे. अशा प्रकारे कायद्याचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी निलेश वाळुंज या सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.( क्रमशः)

## सोमेश्वर कारखान्याचे रोलर पूजन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा रोलर पुजन सभारंभ सोमवार दि.३० जुन २०२५ रोजी कारखान्याचे उपाध्यक्ष मिलींद कांबळे व संचालक अभिजीत काकडे यांच्या हस्ते व कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप म्हणाले की, येणा-या गाळप हंगामासाठी कारखान्यातील अंतर्गत कामे प्रगतीपथावर असुन गतवर्षीप्रमाणेच आपला हंगाम यशस्वी व सुरळीत पार पडेल अशी खात्री आहे. जगताप पुढे म्हणाले की, येणा-या हंगामासाठी तोडणी वाहतुक यंत्रणेचे करारही पुर्ण झाले असुन आजपर्यंत ११२० बैलगाडी, ६०० डंपिग, २० ट्रक, ३७० ट्रॅक्टर, ३० हार्वे स्ट्रचे करार पुर्ण झाले असुन पहिल्या हप्त्याचे देखील वाटप आपण केलेले आहे. येणा-या हंगामासाठी शेतकी विभागाकडे एकुण ३५ हजार ५१२ एकर ऊसक्षेत्राची नोंद झाली असुन यात आडसाली १४४९२ एकर, पुर्वहंगामी ७९१६ एकर, सुरु ४१३२ एकर, खोडवा ८९७२ एकर नोंद आपल्याकडे प्राप्त झालेली आहे. या नोंद झालेल्या क्षेत्रातुन अंदाजे १२ ते १२.५० लाख मे.टन ऊस आपणास गाळपास उपलब्ध होईल. जगताप पुढे म्हणाले की, कारखान्याच्या शेतकी विभागाने हार्वेस्ट्ररने तोड होणेकरीता सभासद शेतक-यांनी पट्टा पद्धतीचा अवलंब करावा या केलेल्या आवाहनास सभासद शेतक-यांनी सहकार्य करुन जास्तीत जास्त पट्टा पद्धत अवलंबवावी.यावेळी कारखान्याचे संचालक सुनिल भगत, शैलेश रासकर, बाळासाहेब कामथे, संग्राम सोरटे, ऋषीकेश गायकवाड, किसन तांबे,अजय कदम, हरीभाऊ भोंडवे, तुषार माहुरकर, जितेंद्र निगडे, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव, वर्क्स मॅनेजर एन.एच. नायकोडे आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# शिंदोडी येथे साडे चार लाखांचा डाळिंब माल चोरीला; तालुक्यातील दुसरी घटना

शिरुर तालुक्यात डाळिंब चोरीची हि तिसरी घटना असुन आधी उरळगाव येथे डाळिंबाची चोरी झाली. त्यानंतर दहिवडी येथे डाळिंब चोरी करताना शेतकऱ्याच्या सतर्कतेमुळे चोर पळून गेले. परंतु त्यानंतर काही दिवसातच शिंदोडी येथे डाळींब चोरी झाली. पोलिसांनी या सर्व घटनेचा सखोल तपास करावा.

**योगेश ओव्हाळ, शिंदोडी तालुकाप्रमुख, शिवसेना शेतकरी सेना**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**न्हावरे :** शिरुर तालुक्यातील शिंदोडी गावातुन एका शेतकऱ्याच्या शेतातून तब्बल ४५०० किलो वजनाचा अंदाजे ४ लाख ५० हजार रुपये किमतीचा डाळिंबाचा माल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिंदोडी येथील शेतकरी शहाजी तुकाराम वाळुंज (वय ५०) यांनी शिरुर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिनांक ०१ जुलै २०२५ ते ०२ जुलै २०२५ दरम्यान शिंदोडी येथील गट नंबर १३ मधील अडीच एकर डाळिंब बागेतील अंदाजे ७५० झाडांवरील ४५०० किलो माल अज्ञात व्यक्तींनी चोरुन नेला. या डाळिंब फळांची जात भगवा असून फळे लाल रंगाची, गोलसर आकाराची होती. या मालाला प्रति किलो दर १०० रुपये प्रमाणे, एकूण अंदाजे ४ लाख ५० हजारांचे नुकसान झाले असल्याची त्यांनी फिर्याद दिली आहे. या घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस हवालदार टेंगले हे करत आहेत.



दखल

# मोहरम मिरवणूक मार्ग ‘नो व्हेईकल झोन’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात मुस्लिम बांधवांचा मोहरम उत्सव साजरा होत असून, यानिमित्त येत्या ५ जुलै रोजी (शनिवार) कत्तलची रात्र मिरवणूक आणि ६ जुलै रोजी (रविवार) मोहरम विसर्जन मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने मिरवणूक मार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वाहतूक बंदी (नो व्हेईकल झोन) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा नो व्हेईकल झोन दिनांक ५ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून ६ जुलै रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. या कालावधीत मिरवणुकीच्या मार्गावर सर्वसामान्य वाहतुकीस बंदी राहणार असून, शासकीय वाहने, ॲम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड, मिरवणुकीसाठी परवानगी मिळालेली वाहने आणि प्रशासनाने अत्यावश्यक सेवेसाठी मान्यता दिलेली वाहने यांना सूट देण्यात आली आहे.

**कत्तल रात्र मिरवणूक मार्ग (०५ जुलै):**

कोठला मैदान – फलटन चौकी – बारा इमाम हवेली बाजार – शहाजी चौक – मोची गल्ली – नवा मराठा प्रेस – जुना कारंजा – सबजेल चौक – मनपा चौक – डावरे गल्ली – नालबंद खुंट – रामचंद्र खुंट – किंग्स गेट हवेली – मोठी सवारी – मंगलगेट – दाळमंडई – तेलीखुंट – कापड बाजार – भिंगार वाला चौक – अर्बन बँक रोड – लक्ष्मीबाई – पंचपिर – धावडी – जुना बाजार रोड – धरती चौक – हातमपुरा – कोंड्या मामा चौक – फलटन चौकी.

मोहरम विसर्जन मिरवणूक मार्ग (०६ जुलै):

कोठला – फलटन चौकी – बारा इमाम हवेली – मंगलगेट – आडते बाजार – पिंजार गल्ली – पारशा खुंट – जुना कापड बाजार – देवेंद्र हॉटेल – ख्रिस्त गल्ली – बुरुड गल्ली – जुना बाजार – पंचपिर – चावडी – मनपा – दो बोटी – चिरा मस्जिद – कोर्ट मागील बाजू – चौपाटी – कारंजा – दिल्ली गेट – निलक्रांती चौक – बालिकाश्रम रोड – बारा इमाम – बारव – सावेडी गाव.या काळात नागरीकांनी वाहतूक बंदीचे पालन करून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे. शहरातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी नागरिकांचा सहकार्य अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नाल ए हैदर सवारीची रविवारी मिरवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** शहरातील प्रशासकीय इमारती जवळील फकीरवाडा वार्ड न.१ परिसरातील नाल ए हैदर मलंग शहा यांची मोहरम निमित्त सवारी मिरवणूक निघणार असून छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील गिरमे चौकातून सैलानी बाबा दर्गा येथे सवारींचे विसर्जन होणार आहे सालाबाद प्रमाणे याही वर्षी नाल ए हैदर मलंग शहा यांची मोहरम निमित्त सवारी मिरवणूक निघणार असून यावेळी संत मदर तेरेसा चौक प्रशासकीय इमारतीसमोर सरबत वाटप व खिचडा वाटप कार्यक्रम होणार आहे तरी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी यामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन अलाउद्दीन पठाण, शाबुद्दीन पठाण ,बब्बू पठाण, समीर सय्यद ,युनूस सय्यद ,याकूब पठाण, शरीफ शेख, यासीन सय्यद, फिरोज पठाण ,युसुफ पठाण, वसीम पठाण, बबलू पठाण यांनी केले आहे.

# राज्य शासनाकडे कामगार हॉस्पिटलचा प्रस्ताव धूळखात पडून

**अहिल्यानगर :** शहरातील एमआयडीसी मधील कामगार हॉस्पिटलचा प्रश्न राज्य शासनाकडे अनेक वर्षांपासून धुळखात पडून असून तो मार्गी लावण्यासाठी उद्योग मंत्री सावंत यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली असून निवेदन दिले आहे लवकरच एमआयडीसीमध्ये कामगार हॉस्पिटल बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले. नगर एमआयडीसी हजारो कामगार काम करत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणे गरजेचे आहे दर महिन्याला कामगारांच्या पगारातून तीनशे रुपये कट होत असतात त्यांच्या हक्काचे हॉस्पिटल एमआयडीसी येथे उपलब्ध होणे गरजेचे आहे कंपनीमध्ये एखादी अनुचित घटना घडत असते यावेळी त्यांना तातडीने उपचार मिळणे गरजेचे आहे त्यामुळे त्यांचा जीव वाचू शकतो अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही, कामगार हा देशाच्या जडणघडणीमधील महत्त्वाचा घटक आहे अहिल्यानगर एमआयडीसी येथे कामगार हॉस्पिटल लवकरात लवकर करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांनी दिली. अहिल्यानगर एमआयडीसीतील कामगार हॉस्पिटल चा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्योग मंत्री उदय सावंत यांना निवेदन देऊन चर्चा करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, संपर्क मंत्री शंभूराजे देसाई, अभिषेक भोसले, अमोल हुंबे, आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात पुढे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले म्हणाले, अहिल्यानगर एमआयडीसी मध्ये मोठ्या प्रमाणात छोटे-मोठे उद्योग असून मालवाहतूक करण्यासाठी विविध राज्यातून मालट्रक या ठिकाणी येत असतात त्यांना वाहनतळ उपलब्ध नसल्यामुळे रस्त्याच्या कडेलाच गाड्या लावल्या जातात त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते तसेच छोटे-मोठे अपघात दररोज होत असतात तरी एमआयडीसीमध्ये मालवाहतूक गाड्यांना उभे राहण्यासाठी वाहनतळ निर्माण करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली असून उद्योगमंत्री सामंत यांनी हे दोन्ही प्रश्न तातडीने मार्गी लावले जातील असे आश्वासन यावेळी दिले असल्याची माहिती बाबुशेठ टायरवाले यांनी दिली

# संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे काम कौतुकास्पद

**सकाळी ११ वाजता रक्तदान शिबीर सुरु झाले सुरुवातीच्या एक तासात ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले किमान सव्वाशे पर्यंत रक्तदान होईल असा अंदाज विखे पाटील फौंडेशनच्या विळद घाटातील रक्तपेढीने अंदाज व्यक्त केला होता मात्र संध्याकाळी उशिरा पर्यंत निघोज – अळकुटी जिल्हा परिषद गटातून मोठ्या संख्येने युवक येत होते. विशेष करुन सायंकाळी सहा वाजेपर्यंत हाच आकडा १७५ पर्यंत झाला होता. यामध्ये मुस्लिम समाजातील युवकांचा आकडा पन्नास पेक्षा जास्त झाला असून मुस्लिम युवकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.**




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** सचिन पाटील वराळ यांच्या नेतृत्वाखाली व ना. राधाकृष्ण विखे पाटील व माजी.खासदार सुजय विखे पाटील यांच्या पाठबळाने संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे काम कौतुकास्पद असून या परिसराच्या विकासासाठी चालना देणारे संदीप पाटील वराळ यांचे नेतृत्व विकासाभिमुख होते. त्यांचेच अनुकरण करीत वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असल्याचे प्रतिपादन भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी व्यक्त केले आहे. संदीप पाटील यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शुक्रवार दि.४ रोजी निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कोरडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून उपस्थीतांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखिले, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष सुभाष दुधाडे, माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, देखरेख संघाचे संचालक संग्राम पावडे, ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग तात्या वराळ, कपिलेश्वर उद्योग समूहाचे संचालक सोमनाथ वरखडे, राजमुद्रा कंट्रक्शन कंपनीचे संचालक बाबाजी लंके, जनता दलाचे तालुकाध्यक्ष विकास कळमकर, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, माजी उपाध्यक्ष संतोषशेठ इधाटे, पत्रकार योगेश खाडे, सुरेश खोसे, तुषार पवार, संजय पावडे, अतुल माने, बाबासाहेब येवले, भास्करराव वराळ, बजरंग वराळ पाटील, अशोक शेळके, दत्तात्रय गुंड, संकेत लाळगे, ग्रामपंचायत माजी सदस्य भिमराव लामखडे, भाजपचे ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष मनोहर राऊत, विठ्ठल चौधरी, नवनाथ येळकर, गणेश धरणे, विवेक ढवण,अरुण आढाव, धनू पांढरे, योगेश निचीत, राजूशेठ लाळगे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, राहुल वराळ, युवा नेते प्रणव भालेराव, संपतराव सालके, गंगादादा वरखडे, ठकाराम गायखे, अर्जुन लामखडे, अनिल सुपेकर, सुभाष गाडीलकर, ओंकार मावळे, बाबा कारले, शशिकांत कारखिले, शिवा पवार, भागाजी पवार, गौरव पवार, राजेश गोपाळे, दत्तात्रय लंके, राजूकाका देशपांडे, रविशेठ रणसिंग, रोहित पठारे, आप्पासाहेब वराळ, विष्णू लाळगे, निलेश घोडे , विलासराव हारदे,अक्षय वरखडे, शिवा पवार, श्रीकांत पवार, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे म्हणाले माजी सरपंच व माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांचे कर्तृत्व फार मोठे होते. फक्त विकासाच्या संकल्पना मांडीत त्यांनी समाजात मोठे काम केले आहे. सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय मोठ्या प्रमाणात विकासकामे करीत त्यांनी जनतेसाठी योगदान दिले आहे. राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखिले यांनी यावेळी संदीप पाटील वराळ यांची माहिती सांगताना सांगितले की संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी संदीप पाटील वराळ यांचे सामाजिक उपक्रम सुरू ठेऊन गरीबांची दिवाळी माध्यमातून मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य जनतेला आधार देण्याचे काम केले आहे. संदीप पाटील वराळ हे असे एक व्यक्तीमत्व होते की समाजासाठी रात्रंदिवस काम करणारे नेतृत्व म्हणून ते परिचीत होते. त्यांच्या जन्मदिवस निमित्ताने रक्तदान शिबिराचा उपक्रम अतिशय स्तुत्य असून सामाजिक उपक्रम माध्यमातून जनसेवा करण्याचा वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचा संकल्प चांगला असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे व राहुल वराळ यांनी केले शेवटी ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग वराळ पाटील यांनी आभार मानले.

# सहारा विकास संस्थेकडून महिलांना मार्गदर्शन व विशेष सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव:** – सहारा सर्वांगीण विकास संस्था श्रीगोंदा आणि कोरो मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.४जुलै रोजी लोणी व्यंकनाथ येथे महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेला महिला मार्गदर्शन व विशेष सन्मान सोहळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला तसेच त्यांच्यासाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजनही करण्यात आले आणि ८५ मुलांना दप्तर पाणी बॉटल व संपूर्ण शालेय साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री व्यंकनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज लोणी व्यंकनाथचे प्राचार्य ए. एल. पुराणे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. महेंद्र शिंदे , डॉ.आर्शिया शेख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी महिलांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवून समाज परिवर्तनात सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहन केले. हारा सर्वांगीण विकास संस्थेचे पदाधिकारी पल्लवी सोनवणे, संतोष जठार आणि कोरो संस्थेच्या उत्तर महाराष्ट्र समन्वयक सोनम धिवर , सुनिता दरवडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात अकबर इनामदार, कराळे भाऊसाहेब, पुराने , श्रुती बोराडे यांचा भारतीय संविधानातील उद्देशिकेची फ्रेम आणि महापुरुषांचे पुस्तक व फेटा आणि गुलाब पुष्प देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्यांनी सामाजिक कार्य, शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरव प्राप्त केला. सन्मानपत्र व्यक्तींनी आपले अनुभव शेअर करत इतर महिलांना प्रेरणा दिली तर श्रुती बोराडे व मंदा जावळे यांनी चळवळीचे गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# खड्डेमुक्तीसाठी मनपाकडून रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी महापालिकेने पॅचिंगच्या कामांना सुरुवात केली आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी होणारी ही कामे यंदा अवकाळी पावसामुळे रखडली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने बांधकाम विभागाने शहरातील विविध रस्त्यांवर तातडीने खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले आहे. कोर्ट गल्ली, आनंदी बाजार, सबजेल चौक, हातमपुरा, जुना मंगळवार बाजार, कापड बाजार, गंज बाजार, बुरुडगल्ली, चौपाटी कारंजा, अर्बन बँक चौक, डाळ मंडई, नालेगाव, मंगळगेट, सर्जेपूरा रस्ता या भागांमध्ये रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. यासोबतच, मध्यवर्ती शहरातील काही प्रमुख रस्त्यांचे काँक्रीटीकरणही सुरू असून, त्या भागातील ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर अतिक्रमण हटवून रस्त्याचे मजबुतीकरण सुरू करण्यात येत आहे. या कामांना गती देण्याचे स्पष्ट आदेश आयुक्त डांगेंनी संबंधित विभागांना दिले आहेत. रस्त्यांची डागडुजी ही पावसाळ्याच्या सुरुवातीलाच झाली पाहिजे. नागरिकांना सुरक्षित व सुसज्ज रस्त्यांची सुविधा देणे हे आमचे प्राधान्य आहे, असेही डांगे यांनी सांगितले.

# ‘राष्ट्रासाठी मध्यस्थी’ मोहिमेला जिल्ह्यात सुरुवात प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्या नगर:** न्यायालयीन प्रक्रियेत वेळ, पैसा आणि श्रम वाचवत न्याय मिळवून देणारी ‘‘राष्ट्रासाठी मध्यस्थी‘‘ ही विशेष मोहीम अहमदनगर जिल्ह्यात १ जुलैपासून ९० दिवसांसाठी राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हा व तालुका न्यायालयांमधील प्रलंबित तडजोड पात्र प्रकरणांवर जलद निपटारा करण्यासाठी मध्यस्थी प्रक्रियेचा लाभ देण्यात येणार आहे. या मोहिमेची अंमलबजावणी मा. सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, मा. अंजू शेंडे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविली जात आहे.

**ही प्रकरणे येणार मध्यस्थी प्रक्रियेत?**

कौटुंबिक वाद मोटार अपघातातील नुकसान भरपाईचे दावे चेक बाउन्स (कलम १३८) प्रकरणे वाटप व वाणिज्यिक दावे इतर तडजोड पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे या सर्व प्रकरणांमध्ये न्यायालयीन मध्यस्थ आणि वकिल मध्यस्थ यांच्यासमोर समेट प्रक्रियेसाठी संधी दिली जाणार आहे. प्रत्यक्ष वा ऑनलाइन सहभागाची मुभा प्रकरणांचे पक्षकार प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहून किंवा आभासी (ऑनलाइन) पद्धतीने देखील या मोहिमेत सहभागी होऊ शकतात. या मोहिमेचा लाभ घेण्यासाठी पक्षकारांनी जिल्हा किंवा तालुका न्यायालयात तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन श्री. कृष्णा एम. सोनवणे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांनी केले आहे.

पक्षकारांसाठी नामी संधी! प्रकरणे लवकर मिटवून न्यायालयीन खर्च व वेळेची बचत करणाऱ्या या मोहिमेमुळे पक्षकारांना मोठा दिलासा मिळणार आहे. पारंपरिक न्यायप्रक्रियेपेक्षा सुलभ, जलद आणि सौहार्दपूर्ण मार्गाने न्याय मिळवून देणारी ही मध्यस्थी मोहीम अधिकाधिक नागरिकांनी स्वीकारावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सहकारी बँक शेतकऱ्यांच्या प्रपंचाशी निगडित : घुले

## शेवगाव येथे जिल्हा सहकारी बँक सेवानिवृत्तीबद्दल कर्मचाऱ्यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** अहमदनगर जिल्हा सहकारी बँक ही शेतकऱ्यांची प्रपंचाशी निगडित असलेली बँक आहे बँकेडरे कर्ज वाटप करताना वाटप केलेल्या कर्जाची वसुली होणे देखील महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक चंद्रशेखर घुले पाटील यांनी जिल्हा सहकारी बँकेच्या शेवगाव येथील येथे आयोजित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना केले यावेळी चंद्रशेखर घुले पाटील यांनी सांगितले की भविष्यकाळात नवोदित कर्मचारी वर्गाने जुन्या अनुभवी अधिकारी वर्गाने कसे काम केले याचा आदर्श घ्यावा कारण शेतकरी आणि बँक यांच्यातील दुवा म्हणून कर्मचारी काम करत असतो यावेळी सेवानिवृत्त झाल्याबद्दल शेवगाव तालुका विकास अधिकारी भाऊसाहेब चेके,वसुली अधिकारी व उप व्यवस्थापक कल्याण आढाव,उप व्यवस्थापन काकासाहेब पायघन, शहरटाकळीचे शाखाधिकारी श्रीहरी घानमोडे, ढोरजळगांव इन्स्पेक्टर मधुकर चौधर, खरडगांवचे शाखाधिकारी रमेश वखरे दहिगांवचे इन्स्पेक्टर हरीचंद्र गुंड, यांचा चंद्रशेखर घुले पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी काकासाहेब नरवडे संचालक पंडित भोसले, राजेंद्र पाऊलबुध्दे, सरपंच काकासाहेब घुले,विलास लोखंडे ,विष्णु कोठुळे , अनिल भुसारी , आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओ एस कोठुळे यांनी केले सूत्रसंचालन संजय भुसारी यांनी केले तर आभार भगवान निकम यांनी मानले.

**माजी आमदार नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विकास अधिकारी म्हणून काम करताना शेतक-यांची कामधेनू म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज वितरण व वसुली या गोष्टीकडे वेळोवेळी लक्ष देण्यात आले. शेतीशी निगडित आसणा-या शेतकरी राजाला पुर्वीच्या काळी राष्ट्रीयकृत बँक कर्ज वितरणास दिरंगाई करत असत त्यावेळी जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतक-यांना मुलीच्या लग्नासाठी, शिक्षणासाठी शेतीसाठी कर्ज पुरवठा वितरण करण्यासाठी शेतक-यांची अडचण लक्षात घेऊन घुले बंन्धुच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करण्यात आला.**

**भाऊसाहेब चेके**
**( सेवानिवृत्त शेवगाव तालुका विकास अधिकारी जिल्हा सहकारी बँक)**




# आत्मारामगिरी महाराज प्रकटदिन साजरा श्री क्षेत्र मांदळीत हजारो भाविकांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** श्री.क्षेत्र मांदळी येथील ब्रह्मरुपविदेही मठाधिपती आत्मारामगिरी बाबा महाराज यांचा प्रकट दिन (जन्मोत्सव) सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कर्जत तालुक्यातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री.क्षेत्र मांदळी येथील ब्रह्मरुपविदेही आत्मारामगिरी महाराज यांचा प्रकटदिन (जन्मोत्सव) सोहळा शुक्रवार दि.४ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्रकटदिन सोहळ्यानिमित्त श्री.लालगिर बुवा मठ संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी टाळ मृदुंगाच्या गजरात पारंपारिक वाद्यांसह वाजत गाजत लालगिर स्वामी, आत्मारामगिरी महाराज यांचा जयघोष करत भक्तीमय वातावरणात लेझीम पथकासह गावातून रथ मिरवणूक प्रदक्षिणा काढण्यात आली होती. यावेळी पांडुरंगाचा गजर करत जयघोषाने मांदळीनगरी दुमदुमून गेली होती. मिरवणुकीनंतर आरती, पूजा विधी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करून पुष्पवृष्टी करत फटाक्यांची जोरदार आतषबाजी करून प्रकटदिन साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे अशोक महाराज भोसले (संत नामदेव महाराज गुरूकुल, पारगाव जोगेश्वरी आष्टी) यांचे हरिकिर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात आणि परिसरात नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली. संपूर्ण मिरवणूक प्रदक्षिणा मार्ग रांगोळ्यांनी सजवून मंदिराचा गाभारा आकर्षक फुलांनी सजवण्यात आला होता. परिसरातील भाविक भक्त दर्शनाकरिता दिवसभर येत असल्याने येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना श्री.लालगिर स्वामी बुवा मठ संस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आत्मारामगिरी महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त दर्शनासाठी पहाटेपासून राज्यासह जिल्हाभरातून भाविक भक्तांचा व पायी दिंड्यांचा ओघ वाहत होता. यावेळी दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना सुलभरित्या दर्शन घडवून आणण्यासाठी तसेच महाप्रसाद वाटपाकरिता येथील ट्रस्टचे अध्यक्ष धनेश गांगर्डे, सचिव राजेंद्र गांगर्डे, खजिनदार रमेश शिंदे, विश्वस्त केशव हौसराव गांगर्डे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी गांगर्डे तसेच सर्व विश्वस्त मंडळ व पदाधिकारी, कर्मचारी यांनी उत्तमरित्या नियोजन केले होते. या जन्मोत्सव सोहळाकरिता ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, मांदळी पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ, स्वयंसेवक, भक्तगण, भजनी मंडळी विशेष परिश्रम घेत होते.

भाग्यवंत थोर मांदियाळी नगरी । चंद्रभागे तिरी जशी विठू पंढरी, ईश्वर निष्ठा जयाच्या वसे अंतरी । तोची आमुचा देव आत्माराम या पंक्ती प्रमाणे जयदेव जयदेव जय आत्मारामा । आरती ओवाळू स्वामी सदगुरूधामा म्हणत फडफडणाऱ्या भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर अन् हरिभजनात तल्लीन होऊन वारकरी व स्थानिक मंडळी सोहळ्यातील भक्तीरसात न्हाहून निघाली...

# २० वर्षांपासून फरार आरोपीस श्रीगोंदा पोलिसांनी ठोकल्या बेडया



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा:** येथील पोलीस ठाण्यातील दाखल फौजदारी गुन्ह्यात २० वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देऊन फरार असलेल्या आरोपीला फौजदारी न्यायालय श्रीगोंदा यांच्याकडून वॉरंट जरी केल्यावर श्रीगोंदा पोलिसांनी मोठ्या शिताफीने वॉरन्ट मध्येआरोपी अटक केला आहे पोलिसाच्या या दमदार कारवाईचे सर्वच स्तरातून कौतुक होताना दिसत आहे. फौजदारी न्यायालय श्रीगोंदा यांचेकडील संक्षिप्त फौजदारी खटल्यातील नॉनबेलबल वॉरन्ट मधील आरोपी नामे शफीक अदम अत्तार रा. लिंपणगाव ता.श्रीगोंदा जि. अहिल्यानगर हा वॉरन्ट मध्ये सुमारे २० वर्षापासुन न्यायालयात हजर राहत नव्हता. तसेच तो त्याचे दिले पत्यावर मिळुन येत नव्हता. आरोपीबाबतचे प्राप्त नॉनबेलबल वॉरन्टचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी बीटचे अं मलदार पोना/भागवत व पो. अंमलदार मनोज साखरे यांना सुचना देवुन आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार पोना भागवत व पो अं साखरे असे आरोपीचा शोध घेत असताना पो अंमलदार साखरे यांना आरोपीनामे शफीक अदम अत्तार रा. लिंपणगाव ता. श्रीगोंदा जि.अहिल्यानगर हा वांगदरी गावचे शिवारात येणार असल्याचे खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाल्याने त्यास वांगदरी गावचे शिवारात सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, .उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांचे मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे, पोना ज्ञानेदव भागवत, पोकॉ मनोज साखरे, यांनी केली आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार, दि.५ जुलै २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ८

## तीन बेवड्यांवर पोलिसांची कारवाई

**नेवासा** : मद्यधुंद अवस्थेत नेवासा फाटा येथील परिसरात एकमेकांना मारहाण करत असलेल्या तीन बेवडयांवर पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी कारवाई केली आहे. मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करण्याच्या अपराधाखाली मुंबई दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, ३ जुलै रोजी सायंकाळी ५.१५ वाजण्याच्या सुमारास पोलिसांच्या आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेच्या ११२ क्रमांकाला कॉल आला की, विरान्स वाईन्स नेवासा फाटा समोर दोन ते तीनजण मारहाण करीत आहेत. माहितीवरून पोलीस कॉन्स्टेबल नारायण डमाळे व पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, पोलीस हवालदार किरण गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल गणेश जाधव हे तेथे गेले. त्या ठिकाणी तीनजण मद्यधुंद अवस्थेत एकमेकांना दगडाने मारहाण करीत होते. जाधव यांना ही माहिती दिल्यावर त्यांनी शासकीय मोबाईल क्रमांक दोन घटनास्थळी तातडीने पाठवली. प्रविण काशिनाथ शेळके, अंकुश अशोक डौले, अक्षय अशोक दळवी (सर्व रा. नेवासा बुद्रुक) या तीनजणांना ताब्यात घेण्यात आले. तिघांची ग्रामीण रुग्णालय नेवासा फाटा येथे वैद्यकीय तपासणी केली असता ते मद्यार्काच्या अमलाखाली आढळून आले.

# चुकीच्या गोष्टींना उत्तर द्यावे लागेल : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संतांचा समतेचा विचार हा राज्यघटनेमध्ये आहे. काँग्रेसचा विचार हा शाश्वत विचार असून तरुणांना काँग्रेसमध्ये मोठी संधी आहे. तालुक्यामध्ये काही लोक दांडगाई करू पाहत आहे. अशा लोकांना वेळीच रोखले पाहिजे. हा तालुका सुसंस्कृत विचारांचा आहे. आपली राजकीय सुसंस्कृत परंपरा जपत येणाऱ्या काळात चुकीच्या गोष्टींना उत्तर द्यावेच लागेल, असे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे काँग्रेसचे नूतन तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांच्या सत्कारसमारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पांडुरंग घुले, इंद्रजीत थोरात, मावळते अध्यक्ष मिलिंद कानवडे, डॉ. जयश्री थोरात, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, विश्वासराव मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, अर्चना बालोडे, संपतराव डोंगरे, नवनाथ आरगडे, सुरेश झावरे, सुभाष सांगळे, रावसाहेब दुबे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, तालुक्याला संघर्षाचा इतिहास आहे. अनेक वर्षांच्या कामातून हा तालुका उभा राहिला आहे. सुसंस्कृत राजकीय परंपरा ही आपली ओळख आहे. मात्र सध्या तालुक्यात वातावरण चुकीचे होत आहे. ज्येष्ठ व तरुणांना एकत्र येऊन संघर्ष करावा लागेल. दमदाटी, दांडगाईचा बंदोबस्त करावा लागेल. आपण सुसंस्कृत आहोत. पण चुकीचे कोणी वागत असेल तर ते होऊ देणार नाही .यावर कार्यकर्त्यांनी ठाम झाले पाहिजे. अनेक लोक विष कालवण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा चुकीच्या गोष्टींना वेळीच उत्तर द्यावे लागेल. तालुक्याची सुसंस्कृत राजकीय संस्कृती टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका मोठ्या मताधिक्याने आपल्याला जिंकायच्या आहेत.

आपसातील मतभेद दूर ठेवून जनकल्याणाचा व संतांचा विचार असलेला काँग्रेसचा शाश्वत विचार घेऊन प्रत्येकाने काम करावे असे आवाहन त्यांनी केले. फटांगरे यांनी मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक नवनाथ आरगडे यांनी केली तर सोमेश्वर दिवटे यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर तालुका काँग्रेसचे पदाधिकारी, अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी व युवक काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

### वारीचा अनुभव संस्मरणीय : डॉ. थोरात

थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील ५०० युवक वारीमध्ये सहभागी झाले. अभंग, फुगड्या, भजन असा विठ्ठलाचा नामाचा गजर करत या वारीमध्ये सर्वजण स्वतःला विसरून सहभागी झाले होते. जीवनात एकदा तरी वारी करावी असे सांगताना सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रचंड झालेली ट्रॅफिक हटवण्यासाठी संगमनेरच्या युवा वारकऱ्यांनी केलेली मदत कौतुकास्पद ठरली असून वारीचा अनुभव हा सर्वांसाठी जीवनात मोठा अनमोल ठेवा ठरला असल्याचे डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या.

# गुरुपौर्णिमा उत्सवाची साई संस्थानतर्फे जोरदार तयारी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्यावतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी ९ ते ११ जुलै याकाळात श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी साई संस्थानच्यावतीने जोरदार तयारी सुरू झाली आहे.

संस्थानकडून १ लाख ६६ हजार २७२ भक्तमंडळ सभासदांना निमंत्रणपत्रिका पाठविण्यात आलेल्या असून ३ लाख ५० हजार देणगीदार साईभक्तांना ईमेलद्वारे आंमत्रित करण्यात आलेले आहे. अमेरिका येथील साईभक्त श्रीमती सुब्बा पै यांच्या देणगीतून आकर्षक फुलांची सजावट करण्यात येणार आहे. तसेच उत्सवकाळात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

गाडीलकर म्हणाले की, साईबाबा गुरुपौर्णिमा शिर्डीत उत्साहात साजरी करत होते. यावर्षी उत्सवानिमित्त वेगवगळया ठिकाणांहून येणाऱ्या ३० पालख्यांनी नोंदणी केलेली आहे. भाविकांचे पावसापासूनच्या संरक्षणासाठी मंदिर व संस्थान परिसरात सुमारे ६३ हजार ७०० चौरस फूट मंडप उभारण्यात आले आहेत. पुण्यारून शिर्डीला येणाऱ्या पालख्यांना थांब्यांच्या ठिकाणी साधारण ३३ हजार चौ.फूट पावसाळी मंडप उभारण्यात आलेले आहे. पालख्या शिर्डी येथे आल्यानंतर पदयात्रींची साई धर्मशाळा येथे नाममात्र दरात निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे-सोनटक्के, समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे सर्व प्रशासकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

### भक्तांसाठी सर्वकाही

उत्सव काळात श्री साईप्रसादालयात अंदाजे ३ लाखाहून अधिक साईभक्त प्रसाद भोजन घेतील असे नियोजन करण्यात आलेले आहे. तीन दिवस उत्सवात वेगवेगळे मिष्ठान्न प्रसाद भोजनात देण्यात येणार आहे. दर्शनरांगेत व परिसरात भक्तांना चहा, कॉफी व दूध सुलभतेने मिळावे यासाठी साई कॉम्प्लेक्स, साईआश्रम, धर्मशाळा, भक्तनिवासस्थान (५०० रुम), साई उद्यान इमारत परिसर, नवीन दर्शनरांग, शांतीनिवास इमारतीतील दर्शनरांगेत तळमाळा व पहिल्या माळ्यावर चहा व कॉफीची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे. गुरुस्थान मंदिरासमोर दिक्षीत वाडा, नविन दर्शनरांग, शांतीनिवास इमारत दर्शनरांग, मारुती मंदिराशेजारील श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप, श्री साईआश्रम व श्री साईप्रसादालय आदी ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु राहणार असून या ठिकाणी तातडीच्या वैद्यकीय सेवेसाठी रुग्णवाहीकाही तैनात करण्यात आलेल्या आहेत. श्री साईआश्रम, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई धर्मशाळा व श्री साईप्रसादालय आदी ठिकाणाहून संस्थानच्या जादा बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

### २१० बुंदी व लाडू प्रसादाचे नियोजन

श्रींचे दर्शनानंतर मोफत बुंदी प्रसाद देण्यात येतो. यावर्षी ६० क्विंटलचे ३ लाख मोफत बुंदी प्रसाद पाकिटे बनविण्याचे नियोजन असून उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहजतेने उपलब्ध व्हावे यासाठी विक्रीकरीता १५० क्विंटलचे ४ लाख लाडूप्रसाद असे एकूण २१० क्विंटलचा बुंदी व लाडु प्रसाद बनविण्याचे नियोजन असून दर्शनरांग कॉम्प्लेक्स, श्री साईनाथ मंगल कार्यालय, गेट नंबर ४ चे जवळ, मारुती मंदिराशेजारी साईकॉम्प्लेक्स, श्री साईप्रसादालय, सेवाधाम इमारत व साई आश्रम धर्मशाळा आदी ठिकाणी लाडू विक्री केंद्र उभारण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यकता भासल्यास अतिरिक्त लाडू विक्री केंद्र उभारण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व शिर्डी परिसरात बंदोबस्त चोख ठेवण्यासाठी संस्थान सुरक्षा विभागाचे संरक्षण कर्मचारी, पोलिस अधिकारी व कर्मचारी, शिघ्र कृतीदल पथक, बॉम्ब शोधक पथक तैनात करण्यात आले आहे. याबरोबरच श्री साईबाबा संस्थान, पोलिस प्रशासन व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त अतिक्रमण व दलाल प्रतिबंधक पथक ही सज्ज ठेवण्यात आलेले आहेत.

### धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

उत्सव कालावधीतील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतील.९ जुलैला पहाटे ०५.१५ वा. श्रींची काकड आरती, नंतर श्रींची पोथी व प्रतिमा मिरवणूक, ६ वाजता द्वारकामाई मंदिरामध्ये श्री साईसच्चरित्र ग्रंथाचे अखंड पारायणास सुरवात त्यानंतर विविध धर्मिक विधींसह सकाळी, दुपार, संध्याकाळ व रात्री श्रींची आरती होईल. विजय साखरकर, बोरीवली यांचा साईस्वर नृत्योत्सव हा कार्यक्रम होईल. रात्री श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात येईल. श्रींची शेजारती रात्रौ १० वाजता होईल. यादिवशी अखंड पारायणासाठी व्दारकामाई मंदिर रात्रभर खुले राहणार आहे. तीनही दिवस असेच विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

# बुद्धीबळपटू डी. गुकेशने कार्लसनची मस्ती उतरवली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नवी दिल्ली : भारताचा युवा बुद्धीबळपटू डी. गुकेशने ग्रँड चेस टूर स्पर्धेत नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन याचा पराभव केला. क्रोएशियातील जगरेब येथे रंगलेल्या बुद्धीबळ स्पर्धेतील सहाव्या फेरीत डी. गुकेशने बुद्धीबळ जगात सर्वोत्तम असलेल्या कार्सनला पुन्हा एकदा जागा दाखवली. या लढतीआधी मॅग्नसने गुकेश माझ्यासमोर अगदी किरकोळ असल्याचे म्हटले होते.

या स्पर्धेतील पहिल्या दिवशी मसुपर यूनायटेड रॅपिड अन् ब्लिट्ज चेस टूर्नामेंटफच्या पहिल्या तीन फेरीनंतर भारताचा डी. गुकेश संयुक्तरित्या अव्वलस्थानी होता. चौथ्या फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि पाचव्या फेरीत अमेरिकन ग्रँडमास्टर फॅबियानो कारूआना याला पराभूत केल्यावर सहाव्या फेरीत डी. गुकेश याच्यासमोर कार्लसन याचे मोठे आव्हान होते.

सध्या बुद्धीबळ जगतात दबदबा असणाऱ्या खेळाडूला शह देत डी. गुकेशने स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी केली. बुद्धीबळाच्या पटलावर सर्वोत्तम खेळ दाखवत गुकेशने मॅग्नसचीची मस्ती उतरवली.

भारतीय डी. गुकेश हा कमकुवत खेळाडूंपैकी एक आहे, अशा शब्दांत कार्लसन याने भारतीयासोबतची लढत माझ्यासाठी एकदम सोपी आहे, असे म्हटले होते. पण रॅपिड गटातील लढतीत डी. गुकेशने सर्वोत्तम खेळ करत पहिली बाजी जिंकून २ गुण आपल्या खात्यात जमा केले आहेत. आता या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंमध्ये ब्लिट्झ प्रकारात दोन लढती होणार आहे. डी. गुकेश याने याआधी नॉर्वेतील बुद्धीबळ स्पर्धेतही कार्लसनला पराभूत केले होते. आता दुसऱ्यांदा डी. गुकेशनं स्टार बुद्धीबळपटूसमोर छाप सोडली आहे. डी गुकेश शिवाय आर प्रज्ञाननंदा यानेही या खेळाडूला पराभूत करुन दाखवले आहे.

# काटे टाकण्याच्या कारणावरून तिघांना मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तुम्ही आमच्या जागेत काटे टाकू नका, असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी नूतन नाईकवाडे यांच्यासह त्याचे पती व सासऱ्यांना शिवीगाळ करत लाकडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना १ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

नूतन महेंद्र नाईकवाडे (वय ३९ वर्षे) तालुक्यातील तांदुळनेर येथे कुटुंबासह राहत असून त्यांच्या घराशेजारी आप्पासाहेब आबासाहेब नाईकवाडे हा त्याच्या कुटुंबासह राहण्यास आहे. तो नेहमी रस्त्यातून येण्या-जाण्याच्या कारणावरुन वाद घालीत असतो. १ जुलैला सायंकाळी ७ वाजता नूतन नाईकवाडे त्यांच्या घरासमोर असताना आरोपी जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावरील काटे काढून त्यांच्या जागेत लोटत होता. नूतन यांचे पती महेंद्र व सासरे दशरथ त्यांना म्हणाले की, तुम्ही आमच्या जागेत काटे टाकू नका. असे म्हणाल्याचा राग आल्याने त्यान नूतन, महेंद्र नाईकवाडे व दशरथ नाईकवाडे यांना मारहाण केली. तसेच पुन्हा आमचे नादी लागलात तर तुम्हाला जीवे ठार मारुन टाकू, अशी धमकी दिली. झटापटीत नूतन यांच्या गळ्यातील गंठन तुटुन व मोबाईल गहाळ झाला. नूतन नाईकवाडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी आप्पासाहेब आबासाहेब नाईकवडे व बाबासाहेब शिवराम नाईकवाडे (दोघे रा. तांदुळनेर, ता. राहुरी( यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.

# हॉकी खेळण्यासाठी पाकिस्तानचा हॉकी संघ भारतात येणार?

**नवी दिल्ली** : भारत आणि पाकिस्तानमधील गेल्या काही महिन्यांपासून तणावाच्या पार्श्वभूमीवर क्रीडा मंत्रालयातील सूत्रांनी स्पष्ट केले आहे की, ते पुढील महिन्यात भारतात होणाऱ्या आशिया कपमध्ये सहभागी होण्यापासून पाकिस्तान हॉकी संघाला रोखणार नाहीत. क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले की, बहुराष्ट्रीय स्पर्धेत कोणत्याही संघाच्या सहभागाच्या विरोधात ते नाहीत.

हॉकी आशिया कप २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत बिहारमधील राजगीर येथे होणार आहे. क्रीडा मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले की, भारतात होणाऱ्या बहुराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कोणत्याही संघाच्या विरोधात आम्ही नाही, परंतु द्विपक्षीय मालिका ही वेगळी बाब आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांची मागणी आहे की, आम्ही कोणालाही स्पर्धेतून वगळू शकत नाही. रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे, परंतु ते बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळतात. सप्टेंबरमध्ये क्रिकेटचा पुरुषांचा आशिया चषक झाल्यास भारताला पाकिस्तान विरुद्ध खेळण्याची परवानगी दिली जाईल का, असे विचारले असता, क्रीडा मंत्रालयाकडून सांगण्यात आले की, ङ्गङ्गबीसीसीआयने या विषयावर आमच्याशी संपर्क साधलेला नाही. जेव्हा ते आम्हाला याबद्दल विचारतील तेव्हा आम्ही काय करायचे ते पाहू.ङ्गङ्ग दरम्यान, ऑपरेशन सिंदूरमुळे पुढील महिन्यात होणाऱ्या आशिया कप हॉकी स्पर्धेत पाकिस्तानच्या सहभागाबद्दल शंका निर्माण झाल्या होत्या.भारतासह आठ संघ हॉकी आशिया कपमध्ये सहभागी होतील.

# प्रभागनामा : अहिल्यानगरच्या समस्या उघडकीस

## विकास थांबला, त्रास वाढला - प्रभाग चारचा नागरी आक्रोश!

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर : प्रभाग क्रमांक चारमध्ये विकासाच्या नावाखाली सुरू झालेली कामं केव्हाच थांबली आहेत, पण त्या अर्धवट कामांचे दुष्परिणाम नागरिकांना रोज नव्याने भोगावे लागत आहेत. सुमारे २०,६३० लोकसंख्या असलेल्या या प्रभागात अनेक ठिकाणी रस्त्यांचे काम रखडल्यामुळे आणि नाल्यांवर अतिक्रमण झाल्यामुळे नागरिकांना अक्षरशः पावसाळ्यात घरात पाणी साचवून जगावं लागतंय.

महानगरपालिकेकडे तक्रारी करून नागरिकांचे घसे कोरडे पडले, पण नाल्यांची रुंदी वाढवण्याऐवजी त्यावरच बांधकामे करून लोकांच्या जिवाशी खेळ सुरू आहे. अतिक्रमणामुळे नैसर्गिक प्रवाह अडतो आणि परिणामी, पावसात सांडपाणी थेट घरात शिरते. स्वतःचं घर असूनही नागरिकांना 'पाण्यात जगण्याची' शिक्षा मिळते आहे.

### कोहिनूर ते पारिजात - दोन महिन्यांचे खोदकाम, अंतहीन त्रास

प्रभागातील सर्वात मोठा कोहिनूर चौक ते पारिजात चौक रस्त्याचे काम गेले दोन महिने 'संतगती'ने सुरू आहे. वाहनधारकांसाठी हा रस्ता म्हणजे एक दुःस्वप्न बनला आहे. काम सुरू असलेल्या ठिकाणी ना योग्य सूचना फलक, ना पर्यायी मार्ग. परिणामी अपघातांची शक्यता अधिकच वाढली आहे.

या रस्त्यालगत आधी बसणारे भाजीविक्रेते आता पाईपलाईन रोड ते एकविरा चौक या मार्गावर भर रस्त्यात बसत असून, त्यांच्या अडथळ्यांमुळे वाहतुकीची कोंडी रोजचीच बाब झाली आहे. मोकाट जनावरं आणि भाजीपाला रस्त्यावर फेकल्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणं म्हणजे धाडसच!

महानगरपालिका या विक्रेत्यांकडून नियमित कर घेत असतानाही त्यांना निश्चित जागा उपलब्ध करून दिली जात नाही, हे दुर्दैव. कर मात्र घेतात, पण मूलभूत सुविधा देण्यात प्रशासन अपयशी ठरतंय. महानगरपालिकेचा हा दुटप्पी कारभार नागरिकांच्या संतापाचा विषय ठरतोय.

### बांधकाम सुरु, पण सुरक्षितता कुठंय?

प्रभागात ठिकठिकाणी उभारल्या जात असलेल्या उंच इमारती पाहिल्या की वाटतं, विकास वेगाने होतोय. पण हे बांधकाम ना ग्रीन नेटने संरक्षित, ना पत्र्यांनी सुरक्षित. वरून काही पडल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. ही निष्काळजी वृत्ती कोणाच्या जिवावर बेतणार, हे सांगता येत नाही.

### घंटागाडी केवळ 'हजेरी'साठी - उचल मात्र नाही!

या प्रभागातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे कचऱ्याची विल्हेवाट.



महिन्यातून केवळ दोन वेळा येणारी कचरा गाडी नागरिकांना सडलेल्या कचऱ्यांच्या ढिगाऱ्यात जगायला भाग पाडते. जिथं-तिथं उघड्यावर कचरा, कुजलेला भाजीपाला, दुर्गंधी - हे रोजचं दृश्य बनलंय.

घंटागाडी फिरते खरी, पण केवळ हजेरीसाठी! प्रत्यक्षात कचरा उचलला जात नाही. महापालिकेच्या कार्यपद्धतीवर त्यामुळे मोठं प्रश्नचिन्ह उभं राहतो.

राष्ट्र सह्याद्री
प्रभागनामा
रोहिणी पवार
अहिल्यानगर

### अतिक्रमण हटवणीची 'निवडक' कारवाई

महापालिकेने काही भागांतील दुकानांवरील अतिक्रमण हटवलं, पण केवळ काही काळापुरतं. काही ठिकाणच्या अतिक्रमणाकडे मुद्दामून दुर्लक्ष केलं गेलं, असा आरोप स्थानिक नागरिक करतात. कायद्याची एकाच प्रभागात दोन पातळ्यांवर अंमलबजावणी होणं, हे निषेधार्ह आहे. अतिक्रमण करताना डोळेझाक करणाऱ्या यंत्रणेला जबाबदार धरणार कोण?

### प्रश्न असा की...

महापालिकेने कर घेण्यासाठी, परवाने देण्यासाठी आणि जनतेला 'सूचना' देण्यासाठी यंत्रणा सक्षम ठेवली आहे. पण तीच यंत्रणा रस्त्यांचं नियोजन, नाल्यांचं आराखडा, अतिक्रमणविरुद्ध कारवाई, कचऱ्याचं व्यवस्थापन यासाठी इतकी ठराविक आणि दुर्बल का ठरते?

### प्रशासनाला थेट सवाल

- **जे बांधकाम नाल्यावर केलं गेलं, त्यासाठी परवानगी कुणी दिली? पावसाळ्यात घरात साचणारं पाणी ही**
- **जनतेची जबाबदारी की प्रशासनाची निष्क्रियता?**
- **कर गोळा करायचा अधिकार महापालिकेकडे आहे, पण जागा देण्याची जबाबदारी कुणाकडे?**
- **या अनधिकृत वर्दळीमुळे झालेले अपघात हे कोणत्या खात्याच्या निष्काळजीपणाचं फलित आहे?**
- **अतिक्रमण करताना डोळेझाक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई कधी?**

### नागरिकांच्या थेट प्रतिक्रिया

सरस्वती कॉलनीमधील अतिक्रमणाच्या समस्येसंदर्भात आम्ही महापालिकेला तब्बल १३ वेळा निवेदनं दिली आहेत. दरवेळी कर्मचारी येतात, पाहतात आणि निघून जातात. प्रत्यक्ष कारवाई मात्र शून्य! गेल्या वर्षी रुग्णवाहिका कॉलनीमध्ये अडकल्यामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला. एवढं सगळं घडूनही अतिक्रमण आजही तसंच आहे. प्रशासनाने आम्हाला उत्तर द्यावं - अजून किती जीव जाईपर्यंत ही झोप उडणार?

**- स्थानिक रहिवासी, सरस्वती कॉलनी**

पावसाळा आला की आमच्या घरात पाणीच पाणी! नाल्यावर बांधकाम झालंय आणि सांडपाणी घरात शिरतं. महापालिकेच्या कार्यालयात जाऊन तक्रारी करतो, निवेदन देतो, पण काहीच बदल होत नाही. घर असूनही आम्ही अस्वच्छतेत राहतोय. आमचं आरोग्य कोण सांभाळणार?

**- स्थानिक रहिवासी**

दोन महिने झाले रस्ता खोदून ठेवलेला आहे. संध्याकाळी अंधारात त्या खड्ड्यांमुळे गाडी घसरते, अपघात होतात. दुकानांपुढचं अतिक्रमण कधी हटवतात तर कधी नाही - नियम सर्वांना सारखा का नाही? प्रशासनाचा हा 'पक्षपाती' विकास आहे का?

**- स्थानिक गृहिणी - कोहिनूर चौक**